यवतमाळ | अमरावती | बुलडाणा | अकोला | वाशिम
सर्वाधिक खपाचे लोकप्रिय दैनिक
# नमो महाराष्ट्र
सोमवार, २८ सप्टेंबर २०२६ ✻ वर्ष ५० ✻ अंक २८७ ✻ रु. ३ ✻ संस्थापक संपादक : स्व. बाळासाहेब घुईखेडकर ✻ मुख्य संपादक : विनोद घुईखेडकर ✻ मानद संपादक : वसंत घुईखेडकर

## काँग्रेसचा 'फेक नरेटिव्ह' उघडा पडला: मुख्यमंत्री



■ निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेमुळे काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा 'फेक नरेटिव्ह' पूर्णपणे उघडा पडला असल्याचा दावा करत, राहुल गांधी संवैधानिक संस्थांना बदनाम करून देशात अतिडावी राजवट आणण्याचा आणि अराजकता माजवण्याचा प्रयत्न करत असल्याचा घणाघाती आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. संविधानाचे पुस्तक हातात घेऊन घटनात्मक संस्थांवरील जनतेचा विश्वास उडवणे हे राहुल गांधींचे पूर्वनियोजित डिझाइन असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्त केलेली अराजकतेची भीती आज ते खरी करून दाखवत असल्याचेही फडणवीस यांनी म्हटले.

## संक्षिप्त

### चिखलगावात चोरी
•नमो महाराष्ट्र वणी प्रतिनिधी

गणेश नगर चिखलगाव येथे बंद घराचे कुलूप तोडून पंचवीस हजार रुपये चोरी गेल्याची घटना 24 सप्टेंबर रोजी घडली. वणी पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या गणेश नगर चिखलगाव येथे मोसर नुद्दीन वसिमो उद्दीन शेख राहणार बोधे नगर चिकलगाव यांच्या भावाचे गणेश नगर चिखलगाव येथे घर असून दिनांक 24 सप्टेंबर रोजी दुपारी एक ते सहा वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप कोंडा तोडून घरामध्ये प्रवेश केला. घरातील कपाटातील लॉकरमध्ये असलेले पंचवीस हजार रुपये नगदी चोरून नेले अशी फिर्याद वनी पोलीस स्टेशन येथे दिली असता पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध कलम 305(अ )331(3) बी एन एस अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

### कुऱ्हाडीने वार करून जखमी केले
•नमो महाराष्ट्र नेर

जाण्या येण्यास त्रास होतो इथे बांधकाम करू नको या कारणांवरून वाद होऊन कुऱ्हाडी वार केल्याची घटना हनुमान नगर येथे घडली. नेर शहरातील हनुमान नगर येथे शेख अक्रम शेख मुबारक यांचे घराचे बांधकाम चालू होते दिनांक 26 सप्टेंबर रोजी दुपारी दोन वाजता च्या दरम्यान फुकट नगर नेर येथे राहणारा शेख इकराम शेख जब्बार हा बांधकाम स्थळी आला व इथे बांधकाम करू नको जाण्या येण्यास त्रास होतो. या कारणावरून वाद करून हातातील कुऱ्हाडीने हातावर वार केला असता सदरवार बोटावर ब सल्याने जखम झाली. यावेळी शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट करून नेर पोलीस स्टेशन येथे कलम 351(2),(3),352बी एन एस मुन्हा दाखल केला आहे.

### त्या आरोपींना दोन दिवसाचा पीसीआर
•नमो महाराष्ट्र

पोलीस स्टेशन अवधूतवाडी, यवतमाळ येथील डी.बी. पथकाने आंतरराज्यीय जनावर तस्करीविरुद्ध कारवाई करून मध्य प्रदेश राज्यातून तेलंगणा व आंध्र प्रदेश राज्याच्या दिशेने कत्तलीच्या उद्देशाने घेऊन जाण्यात येत असलेल्या एकूण ६४ जनावरांची सुटका केली आहे. ३ जनावरे मृत अवस्थेत आढळून आली असून, उर्वरित जनावरांची कत्तलीपासून सुटका करून त्यांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले आहे. सदर प्रकरणात मोहब्बत अली, वय २४ वर्षे, रा. सारंगपूर, उत्तर प्रदेश (चालक), एकराम मोहम्मद अजगर, वय ३४ वर्षे, रा. भोपाळ, असीम बोर्ड, मध्य प्रदेश, वाजिद अली साबीर अली, वय ३१ वर्षे, रा. सारंगपूर, उत्तर प्रदेश आणि मोहम्मद असलम मोहम्मद अजगर, वय ३५ वर्षे, रा. भोपाळ, असीम बोर्ड मध्य प्रदेश. यांच्याविरुद्ध संबंधित कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाईमध्ये ६४ जनावरांची एकूण किंमत १२,८०,०००/-, कंटेनर वाहनाची अंदाजे किंमत ३०,००,०००/- तसेच आरोपींच्या ताब्यातून ३ मोबाईल फोन, एकूण ३०,०००/- असा एकूण ४३,१०,०००/- (त्रेचाळीस लाख दहा हजार रुपये) किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींना न्यायालयासमक्ष हजर केले असता त्यांचा दोन दिवसांचा पोलीस कोठडी रिमांड (PCR) मंजूर करण्यात आला आहे.

# शेतकऱ्यांच्या मदतीत कमतरता पडणार नाही

## महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे : दुष्काळग्रस्त भागाची पाहणी, बळीराजाच्या जाणल्या व्यथा

•नमो महाराष्ट्र यवतमाळ





राज्याचे महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज कळंब तालुक्यातील नरसापूर येथील दुष्काळग्रस्त शेत पिकाची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधुन पीक परिस्थिती, वीज, पाणी उपलब्धतेबाबत विचारपूस केली. तसेच पाणी बचतीच्या कामांसह पीक पाहणी, पंचनामे युद्धपातळीवर करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले. तसेच राज्य शासनाने राज्यातील २६५ तालुक्यात दुष्काळ जाहीर केला आहे. शासन गतीने काम करत आहे. शेतकऱ्यांच्या मदतीत कमतरता पडणार नाही. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत करण्याची शासनाची भूमिका असल्याचे त्यांनी शेतकऱ्यांना आश्वस्त केले.

यावेळी आदिवासी विकास मंत्री प्रा.डॉ. अशोक उईके, खासदार संजय देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल खत्री, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे, माजी आमदार संजीवरेड्डी बोदकुरवार, ॲड. प्रफुल्ल चव्हाण, नितीन भुतडा, प्रिया तोडसाम, आरती फुफाटे, देवानंद पवार, उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, तहसीलदार अभय देशपांडे, गटविकास अधिकारी अजय चव्हाण आणि तालुका कृषी अधिकारी सुहास बेंडे यांच्यासह संबंधित अधिकारी व शेतकरी बांधव उपस्थित होते.

### पीक पेराचा विषय ऑन द स्पॉट मार्गी

■ या पाहणी दौऱ्यादरम्यान डिसीएस ॲपवर पीक पेरा नोंदणी केल्यानंतर सॉफ्टवेअर/संकेतस्थळावर हा पीक पेरा प्रदर्शित होत नसल्याची बाब महसूल मंत्र्यांच्या लक्षात आणून देण्यात आली. त्याची वेळीच दखल घेत अतिरिक्त मुख्य सचिव, कृषी आयुक्त आणि जमाबंदी आयुक्त यांना कॉन्फरन्स कॉल करुन अडचणी सोडविण्याचे निर्देश महसूल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

## आज यवतमाळ जिल्हा काँग्रेसचे धरणे

### निवडणूक आयोगाच्या कारभाराविरोधात जिल्हाकचेरीसमोर आंदोलन




•नमो महाराष्ट्र यवतमाळ

अखिल भारतीय काँग्रेस कमिटी व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या निर्देशानुसार मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कारभाराबाबत काँग्रेस पक्षाने उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. देशभरातील जिल्हा काँग्रेस कमिट्यांना २८ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयांवर आंदोलन करण्याचे निर्देश काँग्रेसकडून देण्यात आले आहेत.

मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणासह निवडणूक प्रक्रियेतील विविध बाबींवर काँग्रेस पक्षाने प्रश्न उपस्थित केले असून, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर कारवाई करण्याची तसेच त्यांच्या कार्यकाळातील निर्णय व मतदार यादीतील बदलांची स्वतंत्रपणे समीक्षा करण्याची मागणी पक्षाने केली आहे. दरम्यान, निवडणूक आयोगाने SIR संदर्भातील आदेश तिन्ही निवडणूक आयुक्तांच्या मंजुरीनंतरच जारी झाल्याचे म्हटले आहे.

### सहभागी होण्याचे आवाहन

■ या आंदोलनात यवतमाळ जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाचे सर्व नेते, पदाधिकारी, तालुका व शहर काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी, ब्लॉक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष व पदाधिकारी, महिला काँग्रेस, युवक काँग्रेस, NSUI, सेवादल तसेच विविध विभाग व सेलचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. सचिन नाईक यांनी केले आहे.

■ लोकशाही व्यवस्था, मतदार यादी आणि निवडणूक प्रक्रियेबाबत पक्षाची भूमिका प्रभावीपणे मांडण्यासाठी सर्व संबंधित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## सोलर प्रा.लि. च्या गोदामात चोरी

### अडीच लाखाच्या साहित्यावर चोरट्यांनी मारला डल्ला

•नमो महाराष्ट्र कळंब

तालुक्यातील उमरी शिवार येथील 'एमप्लस कावेरी सोलर प्रा. लि.' च्या सोलर प्लांटच्या गोडाऊनला अज्ञात चोरट्यांनी लक्ष केले असून, गोडाऊनमधील अडीच लाख रुपयांचे साहित्य लांबवल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी कळंब पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, फिर्यादी गजानन बाबारावजी भोयर (वय ३१ वर्षे, व्यवसाय: सेक्युरिटी सुपरवायझर, रा. राजूर, ता. कळंब, जि. यवतमाळ) यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. एमप्लस कावेरी सोलर प्रा. लि. उमरी शिवारातील प्लांटच्या कंपाउंडमध्ये असलेल्या गोडाऊनमधून हा चोरीचा प्रकार घडला. दिनांक १६ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री १०:०० वाजल्यापासून ते २४ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ६:०० वाजेच्या दरम्यानच्या कालावधीत अज्ञात चोरट्यांनी कंपनीच्या आवारात कंपाउंडच्या जाळीच्या खालून आत प्रवेश केला.चोरट्यांनी गोडाऊनच्या मागील भागाचे चार ठिकाणचे नट-बोल्ट खोलून टीन पत्रे काढले आणि गोडाऊनमध्ये प्रवेश करून मोठ्या प्रमाणावर कॉपर केबल, बॅटऱ्या व इतर साहित्य लांबवले.

**चोरीस गेलेला मुद्देमाल**

मेन स्विच मुव्हिंग कॉन्टॅक्ट असेंब्ली कॉपर टिप्स (२ नग), मेन स्विच फिक्सड कॉन्टॅक्ट असेंब्ली कॉपर जॉझ (२ नग), डीसी केबल (मॉड्यूल ते एसएमबी, ६ स्क्वेअर मिमी) - ६०२४ मीटर, ४ सी × २५ स्क्वेअर मिमी अल्युमिनियम केबल - ७३ मीटर

■ शेवटच्या पानावर

■ सदर चोरी प्रकरणातील तारीख व वेळ निश्चित नसल्याने हायवे वरील सीसीटीव्ही फुटेज आधारावर तपास सुरू असून तपास आव्हानात्मक असल्याचे सांगितले एवढ्या मोठ्या करोडो रुपयांच्या प्लांट मध्ये सीसीटीव्ही अजूनही व्यवस्था नसल्याची खंत ही व्यक्त केली.
-ठाणेदार धनराज निळे कळंब पोलिस ठाणे

## यंदा गणरायाला पारंपारिक पद्धतीने निरोप

•नमो महाराष्ट्र प्रतिनिधी वणी

यावर्षीचा गणेशोत्सव शहरासाठी सामाजिक भान आणि शिस्तीचा नवा आदर्श ठरला दरवर्षी गणेश विसर्जन मिरवणुकीत डीजे ,बँजो आणि मोठ्या आवाजातील ध्वनी क्षेत्रांचा पाहायला मिळत असायचा यंदा मात्र या प्रकाराला मोठ्या प्रमाणात आळा बसला.

शहरातील गणेश मंडळांनी पारंपारिक पद्धतीने गणरायाला निरोप देत ध्वनी प्रदूषण टाळण्याला प्राधान्य दिले त्यामुळे वृद्ध लहान मुले तसेच ध्वनी प्रदूषणाचा त्रास होणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला वनी पोलीस स्टेशन तर्फे उत्सव साजरा करताना नियमाचे पालन करण्याची आव्हान करण्यात आले होते पोलिसांच्या या आव्हानाला गणेश मंडळांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने यंदाचा विसर्जन मिरवणुकीत दिसून आले गणेश विसर्जन मिरवणुकीत मोठ्या आवाजातील डीजे आणि बँजो चा वापर न झाल्याने शहरातील वातावरण तुलनेने शांत आणि भक्तीमय राहिले पारंपारिक वाद्य भजन आणि घोषणाच्या माध्यमातून गणरायाला निरोप देण्यात आला उत्सवाचा आनंद घेण्यासाठी मोठ्या आवाजाची गरज नसते हे मंडळांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले

## यंदाचा गणेशोत्सव ठरला खऱ्या अर्थाने पर्यावरणपूरक

### यवतमाळ ग्रामीण पोलिसांचा खडा पहारा

•नमो महाराष्ट्र यवतमाळ :

गेल्या काही वर्षांपासून सण-उत्सवांमध्ये डीजे, प्लाझ्मा, बँजो आणि कर्णकर्कश इलेक्ट्रॉनिक वाद्यांचा वाढता वापर केवळ कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न बनला नव्हता, तर तो मानवी आरोग्य, समाज आणि पर्यावरणासाठीही अत्यंत घातक ठरत होता. मात्र, यंदाच्या गणेशोत्सवाने या सर्व चिंतेना बाजूला सारत जिल्ह्यात एक नवा आणि स्तुत्य पायंडा पाडला आहे. न्यायालयाच्या निर्देशांचे कडक पालन करत आणि डीजेच्या कर्णकर्कश कोलाहलाला पूर्णपणे फाटा देत, यंदा यवतमाळच्या गल्लीबोळात केवळ पारंपरिक वाद्यांचा निनाद गुंजला आणि एका खऱ्या अर्थाने संस्कृतीप्रधान व पर्यावरणपूरक उत्सवाचा श्रीगणेशा झाला आहे.

यवतमाळ ग्रामीण पोलिस ठाण्याअंतर्गत तब्बल ८१ मंडळ येत असून यंदाच्या

■ शेवटच्या पानावर

### पोलिस दादांच्या आवाहनाला प्रतिसाद

■ ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी खुद्द जिल्हा पोलिस अधिक्षक व त्यांच्यासह अनेक ठाणेदारांनी नागरिकांना डिजे न वाजविण्यासाठी आवाहन केले होते. या आवाहनाला नागरिकांनी १०० टक्के प्रतिसाद देत त्यांच्या विनंतीचा मान ठेवला. व बाप्पांना शांततापुर्ण वातावरणात भावपूर्ण निरोप दिला.

## भटक्या कुत्र्यांचा अक्षरशः आतंक!

### खेळता खेळता चिमुकलीवर कुत्र्याची झडप : गालाला घेतला चावा



•नमो महाराष्ट्र प्रतिनिधी

**वणी :** घराच्या अंगणात खेळणाऱ्या चिमुकलीला एका भटक्या कुत्र्याने तिच्यावर झडप घालत गालाचा लचका तोडला विठ्ठलवाडी परिसरात 26 सप्टेंबर रोजी घडलेल्या या धक्कादायक घटनेने नागरिकांच्या काळजाचा ठोका चुकला असून लहान मुलांच्या सुरक्षेतेचा प्रश्न पुन्हा निर्माण झाला झाला आहे.

घराच्या बाहेर खेळत असताना अचानक कुत्र्याने बालिकेवर हल्ला केला या हल्ल्या तिच्या गालाला गंभीर दुखापत झाली चेहऱ्यावर झालेली जखम पाहून कुटुंबीय अक्षरशः हादरले बालिकेला तातडीने उपचारासाठी दाखल करण्यात आले जखम गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी तिला नागपूर येथे हलवण्यात आले आहे या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे आपल्या मुलाला घराबाहेर खेळण्यासाठी पाठवायचे तरी कसे असा प्रश्न पालकांसमोर उभा टाकला आहे

विशेषतः सायंकाळच्या वेळी परिसरात भटक्या कुत्र्यांचे कळप फिरत असल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन नगरपालिका प्रशासनाने तातडीने दखल घेतली आहे रस्त्यावरून जाणारा नागरिकांच्या मागे लागणे दुचाकी स्वारांचा

■ शेवटच्या पानावर

### अखेर पालिका प्रशासनाला 'जाग'!

■ पालिका प्रशासनाची टीम विठ्ठलवाडी परिसरात दाखल झाली असून बालिकेवर हल्ला करणाऱ्या कुत्र्यांचा शोध सुरू करण्यात आला आहे नागरिकांच्या सुरक्षितेच्या दृष्टीने संबंधित कुत्र्याला पकडण्यासाठी प्रयत्न सुरू आहे शहरातील मोकाट कुत्र्यांचा प्रश्न नवीन नाही यापूर्वी नगरपालिका प्रशासनाने कुत्र्यांना पकडण्यासाठी मोहीम राबवली होती आणि कुत्र्यांचे लसीकरण ही करण्यात आले मात्र त्यानंतरही शहरातील विविध भागात मोकाट कुत्र्यांचे कळप पुन्हा दिसून आल्याने नागरीकाकडून उपाय योजनेच्या प्रश्न उपस्थित होत आहे

## भरधाव कारच्या धडकेत निवृत्त शिक्षक ठार







•नमो महाराष्ट्र । वणी

शेतातून दुचाकीने वणीकडे परत येत असलेल्या निवृत्त शिक्षकाच्या दुचाकीला भरधाव स्विफ्ट कार वाहनाने मागून जोरदार धडक दिल्याने त्यांच्या जागीच मृत्यू झाला ही दुर्दैवी घटना रविवारी सायंकाळी चार वाजताच्या सुमारास घुघूस मार्गावरील जन्नत हॉटेल समोर घडली. बाळासाहेब टोंगे राहणार प्रगती नगर असे अपघातात मृत्यू झालेल्या निवृत्त शिक्षकांचे नाव आहे. ते जनता विद्यालयातून शिक्षक म्हणून निवृत्त झाले होते.

मिळालेल्या माहितीनुसार टोंगे रविवारी आपल्या मूळ गावी पुरड येथे दुचाकीने गेले होते गावाहून वणीकडे परत येत असताना जन्नत हॉटेल समोर त्यांच्या दुचाकीला मागून येणाऱ्या भरदास स्विफ्ट कार क्रमांक एम एच 29 ए बी 7771ने जोरदार धडक दिली. धडके नंतर त्यांना काही अंतर फरकट नेण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे या भीषण अपघातात त्यांच्या घटनास्थळी मृत्यू झाला अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली घटनेमुळे प्रगती नगर परिसरात शहरात परिसरासह शहरात हळहळ व्यक्त होत आहे अपघाताबाबत पोलिसांनी पुढील कारवाई सुरू केली आहे.

## स्फोटक विक्रेत्यासह तिघांवर गुन्हा; निष्काळजी हाताळणीचा ठपका, वेल्डिंग करतांना घडली घटना

# विना परवाना स्फोटकांचा खेळ; चौघांचा बळी!

•नमो महाराष्ट्र । अजय कानडे




**उमरखेड :** विना परवाना स्फोटके बाळगून त्यांची निष्काळजीपणे हाताळणी करणे आणि परवाना नसतानाही स्फोटके पुरविल्याप्रकरणी उमरखेड पोलिसांनी स्फोटक विक्रेत्यासह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ढाणकी रोडवरील बैलबाजाराजवळ २६ सप्टेंबर रोजी झालेल्या भीषण स्फोटात चार जणांचा मृत्यू, तर दहा जण जखमी झाले होते. या दुर्घटनेनंतर तालुक्यातील ब्लास्टिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या स्फोटकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या प्रकरणात बाळदी येथील अप्पाराव माधवराव बोक्से (५५), त्यांचा मयत मुलगा वैभव बोक्से आणि ढाणकी येथील बळीराम नरवाडे (५०) यांच्याविरुद्ध उमरखेड पोलीस ठाण्यात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२६ सप्टेंबर रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास ढाणकी रोडवरील बैलबाजाराजवळील वेल्डिंग दुकानात ट्रॅक्टरवर वेल्डिंगचे काम सुरू होते. याचवेळी ट्रॅक्टरमध्ये असलेल्या स्फोटकाचा अचानक स्फोट झाला. स्फोटाची तीव्रता एवढी होती की परिसर हादरून गेला. या दुर्घटनेत चार जणांचा मृत्यू झाला, तर दहा जण जखमी झाले. पोलीस कॉन्स्टेबल किरण राठोड यांच्या फिर्यादीनुसार, अप्पाराव बोक्से व त्यांचा मुलगा वैभव यांच्याकडे स्फोटके

■ शेवटच्या पानावर

### तालुक्यातील ब्लास्टिंग वाहनांची तपासणी होणार?

■ उमरखेड तालुक्यातील अनेक गावांमध्ये दगड फोडणे, विहिरी खोदणे आणि इतर कामांसाठी ब्लास्टिंग करणारी वाहने फिरताना दिसतात. या वाहनांमधून स्फोटकांची वाहतूक व हाताळणी केली जाते. मात्र, संबंधित वाहनधारकांकडे आवश्यक परवाने आहेत का, स्फोटके नियमानुसार साठवली जातात का आणि ती हाताळणाऱ्या व्यक्तींना आवश्यक प्रशिक्षण आहे का, याची तपासणी होणे गरजेचे आहे.

■ उमरखेडच्या भीषण स्फोटात चार जीव गेल्यानंतर प्रशासनाने आता केवळ दुर्घटनेपुरता तपास न करता तालुक्यातील स्फोटकांची संपूर्ण साखळी तपासण्याची गरज निर्माण झाली आहे. स्फोटक विक्रेते, साठवणूकदार, वाहतूकदार आणि ब्लास्टिंग वाहनधारकांची तपासणी करून अनधिकृत स्फोटकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

## राज्यात १०४ तांड्यांना महसुली दर्जा

### देवानंद पवार : तांडा समृद्धी योजनेमुळे वर्षभरात ४० ग्रामपंचायती निर्माण

•नमो महाराष्ट्र यवतमाळ :




संत सेवालाल महाराज बंजारा-लबाना तांडा समृद्धी योजनेला मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे यांनी अधिक गती दिली असून, महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विशेष सहकार्यामुळे यवतमाळ जिल्ह्यातील तांड्यांच्या विकास प्रक्रियेला महत्त्वपूर्ण चालना मिळाली आहे. त्यामुळे जिल्ह्यात ३९ तांड्यांना महसुली दर्जा मिळाला असून, ४० ठिकाणी स्वतंत्र ग्रामपंचायती निर्माण झाल्या आहेत. राज्यातही १०४ तांड्यांना महसुली दर्जा मिळाल्याची माहिती देवानंद पवार यांनी दिली. ते यवतमाळ येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

वर्षभरात ४० ग्रामपंचायतींची निर्मिती होणे हे तांडा समृद्धी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीचे आणि रचनात्मक कार्याचे महत्त्वपूर्ण फलित आहे. महसुली व प्रशासकीय ओळख मिळाल्यामुळे तांड्यांना शासनाच्या विविध योजना, मूलभूत सुविधा आणि विकासकामांचा लाभ अधिक प्रभावीपणे मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, असे पवार यांनी नमूद केले.

पंतप्रधान ना. नरेंद्रजी मोदी यांच्या 'विकसित भारत २०४७' या संकल्पनेच्या दिशेने ग्रामीण व वंचित घटकांचा सर्वांगीण विकास महत्त्वाचा आहे. त्यासाठी तांड्यांना महसुली व प्रशासकीय ओळख मिळवून देणे, स्वतंत्र ग्रामपंचायती स्थापन करणे आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही दूरगामी परिणाम करणारी प्रक्रिया आहे. तांडा समृद्धी योजनेच्या माध्यमातून ही प्रक्रिया गतिमान होत असल्याचे पवार यांनी म्हटले.

संपादकीय

# आयोगाच्या कारभारावर आयुक्तांचाच आक्षेप!

निवडणूक आयोग घटनात्मक संस्था आहे. तो 'स्वायत्त' असल्याचे घटना सांगते. त्यावर टीका सुरु झाल्यावर 'भाजप'त्याचे समर्थन का करत आहे ? त्या पक्षाचे प्रवक्ते विरोधी पक्षांवर टीका का करत आहेत?

निवडणूक आयोगातील दोन आयुक्तांनी आयोगाच्या कार्यशैलीबद्दल आक्षेप नोंदवले. तेही १० महिन्यांत १४ वेळा. ही साधी बाब नाही. आयोगाच्या अनेक निर्णयांबाबत या दोन आयुक्तांना आयोगाने अंधारात ठेवले. येथे आयोग म्हणजे मुख्य निवडणूक आयुक्त असा अर्थ घ्यावा लागेल. नवीन मतदार नोंदण्यासाठी असलेल्या अर्ज क्रमांक ६ मध्ये केलेले बदल 'बेकायदा' व 'अनधिकाराने' केले आहेत. (तो) युवकांना त्रास देण्याचा प्रकार आहे, अशा कडक शब्दांत या आयुक्तांनी आपला आक्षेप नोंदवला होता. ते धुडकावून तो अर्ज नागरिकांच्या माथी मारला गेला. या मागे कोण आहे? हे जनतेस कळले पाहिजे. या वर्षाच्या प्रारंभी आयोगाने 'ईसीआयनेट'हे पोर्टल सुरु केले. कोट्यवधी मतदारांच्या सुविधेसाठी ते आहे, त्यामुळे पारदर्शकता, विश्वासार्हता वाढेल असे तेव्हा सांगितले गेले. मात्र ज्यांनी मतदारांची नावे यादीत समाविष्ट करायची किंवा वगळायची, अशा राज्य पातळीवरील अधिकाऱ्यांनाही ते काम करता येत नसल्याचे अल्पावधीत दिसले. एका प्रकारे त्या अधिकाऱ्यांना या पोर्टलच्या 'बाहेर' ठेवण्यात आले. कारण आयोगाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने 'प्रवेश' (ॲक्सेस) 'मर्यादित' केला होता. ही कसली पारदर्शकता? उघड झालेल्या माहितीने निवडणूक आयोग व मुख्य आयुक्तांवरील संशय गडद झाला आहे.

मतदार याद्यांची विशेष तीव्र पडताळणी -एसआयआर- बिहारमध्ये सुरु झाली तेव्हा पासून त्याची कार्यपद्धती व त्या मागील तर्कशास्त्र यांविषयी आक्षेप घेतले जाऊ लागले. नंतर पश्चिम बंगाल व आता महाराष्ट्रासह अनेक राज्यांत ती सुरु असतानाही ते आक्षेप कायम आहेत. आपले 'अस्तित्व' सिद्ध करण्याची जबाबदारी या मोहिमेने मतदारांवर टाकली आहे. अनेक कागदपत्रे पुराव्यादाखल मागितली गेली. त्या साठी नागरिकांना वेळ कमी दिला गेला. गेल्या अनेक निवडणुकांत मतदान केलेल्यांचेही नाव 'एसआयआर'मधून वगळले गेले. पश्चिम बंगालमध्ये ३८ लाखांपेक्षा जास्त जणांनी त्या बद्दल अपील केले. त्या पैकी केवळ १ लाख २२ हजार अपिलांवर निर्णय झाला. बाकीच्या लाखो मतदारांचे काय करणार? गोव्यातील १७ 'पात्र' मतदारांची नावे वगळली गेली आहेत ती पुन्हा समाविष्ट करावी असे 'ई मेल' गोव्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी एका आठवड्यात आठ वेळा दिल्लीस निवडणूक आयोगास पाठवले. उप निवडणूक आयुक्तांनी तसे आदेशही दिले; पण अंतिम यादीत त्या मतदारांची नावे नव्हती. आयोगाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने ते आदेश जुमानले नाहीत असा त्याचा अर्थ होतो. मतदार कोणावर व कसा विश्वास ठेवणार? नवे मतदार नोंदणे, नावे वगळणे किंवा समाविष्ट करणे, संपूर्ण मतदार यादीचे रक्षण करणे या प्रक्रियेचे केंद्रीकरण करण्यासही दोन निवडणूक आयुक्तांनी विरोध दर्शवला होता. त्याचीही दखल कोणी व का घेतली नाही? मागील 'एसआयआर'च्या वेळी आई/वडील, आजी/ आजोबा 'हयात'होते का? हा प्रश्न नव्या मतदार नोंदणीसाठी सक्तीचा करण्यात आला आहे. तो पूर्वी नव्हता. हा 'बदल' दोन आयुक्तांना सांगण्यात का आला नाही? तो 'कोणाच्या सांगण्यावरून' केला गेला? 'एसआयआर'च्या प्रक्रियेस आक्षेप घेण्यास अनेकांनी न्यायालयात धाव घेतली. सर्वोच्च न्यायालयाने बंगालमध्ये लवाद नेमण्याचे आदेश दिले. अन्य राज्यांत ते का नाहीत? 'एस आय आर'च्या तीन टप्प्यांत सुमारे १३ कोटी नावे वगळली जाणे संशयास्पद आहे. नावे वगळण्यासाठी 'तार्किक विसंगती' (लॉजिकल डिस्क्रिपन्सी) हे नवे कारण आयोगाने काढले आहे. त्याचा अर्थ काय? तळातील शेवटच्या मतदारापर्यंत पोचून त्याचे नाव यादीत समाविष्ट करणे, त्यास मतदानाचा घटनात्मक हक्क देणे ही निवडणूक आयोगाची जबाबदारी आहे. मात्र गेल्या काही वर्षांतील आयोगाचा कारभार विपरीत आहे. निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीचे अधिकार केंद्र सरकारच्या हाती एकवटले आहेत. त्या मुळे, हा आयोग कोणाचा? तो कोणासाठी आहे? एसआयआरचा हेतु काय? हे प्रश्न उभे राहतात.

# 'ढगांचे घर' कोरडे कसे पडले?

मेघालय म्हटले, की डोळ्यांसमोर उभे राहतात धुक्याने वेढलेले डोंगर, कोसळणारे असंख्य धबधबे आणि वर्षाचे बारा महिने बरसणारा पाऊस. 'जगातील सर्वाधिक पावसाचे ठिकाण' म्हणून प्रसिद्ध असलेल्या मेघालयात यंदा मात्र सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला. ही केवळ एका वर्षातील हवामानातील चुकीची घटना आहे, की भारतीय मान्सूनच्या बदलत्या स्वभावाचा गंभीर इशारा?

ज्या राज्याची ओळखच पावसामुळे आहे, त्याच राज्यात पावसाची कमतरता भासणे ही घटना साधी नाही. मेघालयातील पाऊस हा केवळ स्थानिक हवामानाचा विषय नाही, तर भारतीय मान्सूनची ताकद, बंगालच्या उपसागरातील आर्द्रतेचे वितरण आणि हवामानातील संतुलन यांचे तो प्रतीक मानला जातो. त्यामुळे मेघालयात पाऊस कमी पडणे ही संपूर्ण मान्सून व्यवस्थेतील बदलाची चाहूल समजली पाहिजे.

हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार ४ जून ते २८ जुलै या कालावधीत मेघालयात साधारण ६३२.१ मिलीमीटर पाऊस अपेक्षित होता. प्रत्यक्षात मात्र केवळ २७२.९ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. म्हणजेच पावसात तब्बल ५७ टक्क्यांची तूट आली. विशेष म्हणजे मेघालयच नव्हे, तर आसाम, अरुणाचल प्रदेश आणि मणिपूरमध्येही सरासरीपेक्षा मोठी घट नोंदवली गेली आहे. यावरून ईशान्य भारतातील संपूर्ण मॉन्सून प्रणाली यंदा कमकुवत राहिल्याचे स्पष्ट होते. मेघालयात इतका पाऊस का पडतो, यामागे त्याची भौगोलिक रचना कारणीभूत आहे. बंगालच्या उपसागरातून येणारे दमट मान्सून वारे खासी, जयंतिया आणि गारो पर्वतरांगांवर आदळतात. पर्वतांवर चढताना हे वारे थंड होतात आणि त्यातील जलबाष्पाचे रूपांतर पावसात होते.



हवामानशास्त्रात याला 'ओरोग्राफिक रेनफॉल' म्हणजेच पर्वतीय वर्षाव असे म्हटले जाते. या नैसर्गिक प्रक्रियेमुळे मासिनराममध्ये सरासरी ११ हजार ८०२ मिलीमीटर, तर सोहरामध्ये ११ हजार ३५९ मिलीमीटर वार्षिक पाऊस पडतो. त्यामुळेच ही दोन्ही ठिकाणे जगभर प्रसिद्ध झाली; मात्र यंदा या प्रक्रियेलाच खीळ बसल्याचे दिसते.

हवामान विभागाच्या मते, बंगालच्या उपसागरात निर्माण झालेली कमी दाबाची प्रणाली ओडिशामार्गे मध्य भारताकडे सरकली. त्यासोबतच मोठ्या प्रमाणातील आर्द्रताही पश्चिम आणि मध्य भारताकडे वळली. परिणामी, मध्य प्रदेश, छत्तीसगढ, उत्तर प्रदेश, राजस्तान, महाराष्ट्र यांसारख्या राज्यांमध्ये जोरदार पाऊस झाला; पण मेघालय आणि ईशान्य भारत मान्सूनच्या मुख्य सक्रिय पट्ट्याबाहेर राहिला. त्यामुळे ढगांची निर्मिती कमी झाली आणि मुसळधार पावसासाठी आवश्यक असलेली सततची आर्द्रता त्या भागात पोहोचलीच नाही. इनसॅट-३डीएस उपग्रहाच्या प्रतिमांमध्ये मध्य भारतावर दाट ढगांचे साम्राज्य दिसत असताना मेघालयावर ढग विरळ आणि तुटक दिसतात. शिलाँग हवामान केंद्राच्या निरीक्षणानुसार, जगप्रसिद्ध मासिनराम आणि चेरापुंजीमध्येही यंदा अपेक्षेपेक्षा खूपच कमी पाऊस झाला. म्हणजेच निसर्गाच्या नियमांमध्ये बदल घडला. याचा सर्वात मोठा परिणाम शेतीवर होणार आहे. मेघालयातील भात, मका, आले, हळद, संत्री, अननस आणि विविध फळपिकांसाठी नियमित पाऊस अत्यावश्यक असतो. पर्वतीय भागातील अनेक गावे नैसर्गिक झरे आणि डोंगराळ पाणवठ्यांवर अवलंबून आहेत. पाऊस कमी झाल्यास हे झरे आटू लागतात. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचे संकट निर्माण होण्याची भीती आहे. नद्यांमधील पाण्याची पातळी कमी होईल. भूजल पुनर्भरण घटेल आणि पुढील उन्हाळ्यात परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते. पर्यटन क्षेत्रासाठीही ही धोक्याची घंटा आहे. मेघालयचा अर्थच 'ढगांचे घर'. दर वर्षी लाखो पर्यटक केवळ येथील धबधबे, हिरवळ आणि मुसळधार पावसाचा अनुभव घेण्यासाठी येतात. 'नोहकलिकाई', 'सेव्हन सिस्टर्स', 'एलिफंट फॉल्स' यांसारखे धबधबे हे राज्याच्या पर्यटनाचे मुख्य आकर्षण आहेत. पाऊस कमी झाल्यास या धबधब्यांमधील प्रवाह कमी होईल आणि पर्यटन उद्योगालाही मोठा फटका बसेल. २०२५ मध्ये जवळपास १८ लाख पर्यटकांनी मेघालयला भेट दिली होती. या उद्योगावर हजारो कुटुंबांची उपजीविका अवलंबून आहे. या संपूर्ण घटनेतून हवामानबदलाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. हवामानतज्ज्ञ मात्र एका वर्षाच्या आकडेवारीवरून निष्कर्ष काढण्यास तयार नाहीत.

त्यांचे म्हणणे रास्त आहे; परंतु गेल्या दोन दशकांमधील निरीक्षणे वेगळीच कथा सांगतात. भारतात पावसाचे वितरण अधिकाधिक असमान होत चालले आहे. काही भागांमध्ये विक्रमी अतिवृष्टी होते, तर काही भाग दुष्काळाच्या उंबरठ्यावर पोहोचतात. काही दिवसांमध्ये महिनाभराचा पाऊस पडतो, तर नंतर अनेक आठवडे वातावरण कोरडे राहते. ही प्रवृत्ती आता वारंवार दिसू लागली आहे.जागतिक तपमानवाढीमुळे वातावरणात अधिक जलवाष्प साठत आहे. त्यामुळे पावसाच्या घटना अधिक तीव्र होत आहेत; पण त्यांचे वितरण अधिक अस्थिर होत आहे. म्हणजेच एकाच वेळी काही भागांमध्ये पूर आणि काही भागांमध्ये दुष्काळ अशी परिस्थिती निर्माण होत आहे. यंदाच्या मान्सूनने हेच चित्र स्पष्ट केले आहे. आसामच्या काही जिल्ह्यांमध्ये अभूतपूर्व पूरस्थिती असताना मेघालय पावसासाठी आसुसला होता.

भारतीय मान्सून हा जगातील सर्वात गुंतागुंतीच्या हवामान व्यवस्थांपैकी एक आहे. 'अल-निनो', 'ला-निना', हिंदी महासागरातील तपमान, बंगालच्या उपसागरातील कमी दाबाचे पट्टे, जेट प्रवाह आणि स्थानिक भौगोलिक रचना अशा अनेक घटकांवर त्याचे स्वरूप अवलंबून असते. त्यामुळे एका घटकातील छोटासा बदलही हजारो किलोमीटर दूर परिणाम घडवू शकतो, म्हणूनच मान्सूनचे अचूक भाकीत करणे अजूनही हवामानशास्त्रासाठी मोठे आव्हान आहे. या पार्श्वभूमीवर भारताने हवामानबदलाशी जुळवून घेण्याची तयारी अधिक वेगाने करणे आवश्यक आहे. पर्जन्यमानावर अवलंबून असलेल्या राज्यांमध्ये पावसाचे पाणी साठवणे, लहान धरणे, झऱ्यांचे पुनरुज्जीवन, भूजल पुनर्भरण आणि हवामान-अनुकूल शेती यांना प्राधान्य द्यावे लागेल. हवामानाचा अंदाज अधिक अचूक आणि स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देणेही तितकेच आवश्यक आहे. एकीकडे हवामान बदलाचे परिणाम कमी करण्यासाठी कार्बन उत्सर्जनात कपात करण्याचे जागतिक प्रयत्न सुरू आहेत; पण त्याचबरोबर बदलत्या हवामानाशी जुळवून घेण्याची क्षमता वाढवणेही महत्त्वाचे आहे. मेघालयसारख्या राज्यांनी पर्यटन, शेती आणि जलव्यवस्थापनासाठी नव्या परिस्थितीला अनुरूप धोरणे स्वीकारली पाहिजेत. येत्या काळात येथिल परिस्थिती सुधारली, तरी यंदाचा अनुभव हवामानशास्त्र आणि धोरणकर्त्यांसाठी महत्त्वाचा धडा ठरणार आहे. मेघालयातील पावसाची तूट ही केवळ एका राज्याची बातमी नाही. भारतीय मान्सून अधिक अनिश्चित आणि अधिक असमतोल होत असल्याचा हा स्पष्ट संकेत आहे. ज्या भूमीची ओळखच मुसळधार पावसाने आहे, तीच भूमी पावसाच्या प्रतीक्षेत राहते, हा विरोधाभास भविष्यातील हवामानसंकटाचे वास्तव अधोरेखित करतो. आज गरज आहे, ती हवामान बदलाला केवळ पर्यावरणाचा विषय न मानता विकास, अर्थव्यवस्था, शेती, जलसुरक्षा आणि राष्ट्रीय नियोजनाचा केंद्रबिंदू मानण्याची. अन्यथा, आज मेघालय कोरडे पडले आहे; उद्या देशातील इतर पर्जन्यसमृद्ध प्रदेशही अशाच अनिश्चिततेच्या भोवऱ्यात अडकू शकतात. निसर्ग वेळोवेळी इशारे देत असतो. प्रश्न एवढाच आहे की, आपण ते वेळेत समजून घेतो का?

# आकाशातून भेदक नजर

'इस्रो'च्या नव्या उपग्रहामुळे भारताची आकाशातील 'नजर' अधिक तीव्र झाली आहे. या उपग्रहाद्वारे मिळणारी माहिती जमिनीवरील प्रत्येक क्षेत्राच्या विकासासाठी कशी वापरायची, हा पुढचा प्रश्न आहे. अंतराळातील यशाचे रूपांतर शेतातील उत्पादनात, आपत्तीतील बचावात, पर्यावरणाच्या संरक्षणात आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या बळकटीकरणात झाले, तरच या वैज्ञानिक प्रगतीचे व्यापक सार्थक होईल.

भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (इस्रो) जिओसिंक्रोनस कक्षेत 'ई ओ एस-०५' हा इमेजिंग उपग्रह यशस्वीपणे स्थापित केल्याने भारताच्या पृथ्वी निरीक्षण क्षमतेला नवा पैलू मिळाला आहे. बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर, वाढत्या नैसर्गिक आपत्तींच्या काळात आणि राष्ट्रीय सुरक्षेची आव्हाने अधिक गुंतागुंतीची होत असताना, आकाशातून जमिनीवर सतत आणि अचूक नजर ठेवण्याची क्षमता ही देशाच्या सामर्थ्याचा महत्त्वाचा भाग बनली आहे. पृथ्वीनिरीक्षण करणाऱ्या उपग्रहांचे महत्त्व गेल्या काही दशकांमध्ये झपाट्याने वाढले आहे. पूर्वी एखाद्या प्रदेशाचे चित्र मिळवण्यासाठी प्रत्यक्ष पाहणी, विमान किंवा इतर पारंपरिक साधनांवर अवलंबून रहावे लागत असे. आता अंतराळातून मिळणारी छायाचित्रे, विविध प्रकारचे सेन्सर आणि त्यातून उपलब्ध होणाऱ्या माहितीचे संगणकीय विश्लेषण यामुळे पृथ्वीच्या पृष्ठभागावरील बदलांचा सातत्याने मागोवा घेणे शक्य झाले आहे.

पृथ्वीच्या स्वत:भोवती फिरण्याच्या गतीशी ज्याची गती जुळवलेली आहे त्यास 'जिओसिंक्रोनस' कक्षेतील उपग्रह म्हणतात.एखाद्या मोठ्या भौगोलिक क्षेत्रावर सातत्याने ते लक्ष ठेवू शकतात. त्यामुळे बदल घडून आल्यानंतर त्याची माहिती मिळण्याऐवजी बदलांची चाहूल आधीच घेण्याची क्षमता विकसित होते. आधुनिक आपत्ती व्यवस्थापनासाठी ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. भारतासारख्या भौगोलिक आणि हवामानाच्या दृष्टीने वैविध्यपूर्ण देशासाठी अशा उपग्रहांचे महत्त्व अधिक आहे. एखादी नैसर्गिक आपत्ती आली की, सर्वप्रथम गरज असते ती अचूक माहितीची. कोणत्या भागात पाणी शिरले आहे, कोणते रस्ते बंद झाले आहेत, कोणत्या गावांचा संपर्क तुटला आहे, नदीच्या प्रवाहात किती बदल झाला आहे किंवा वणवा कोणत्या दिशेने पसरत आहे, याची माहिती तातडीने मिळाल्यास बचावकार्य अधिक परिणामकारकपणे आखता येते. उपग्रहांकडून मिळणारा डेटा या कामी निर्णायक ठरू शकतो. पूरस्थितीत जमिनीवरून संपूर्ण प्रभावित प्रदेशाचे चित्र एका वेळी मिळणे कठीण असते; मात्र उपग्रहाच्या मदतीने मोठ्या क्षेत्राचा आढावा घेता येतो. पाण्याचा विस्तार, पूरग्रस्त वस्त्या, शेतीचे नुकसान आणि वाहतुकीच्या मार्गांवरील परिणाम यांचे आकलन वेगाने होऊ शकते. त्यानुसार राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांना मदतकार्याचे प्राधान्यक्रम ठरवता येतात. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि 'मशीन लर्निंग'च्या साहाय्याने उपग्रहांकडून मिळणाऱ्या या माहितीचे विश्लेषण आणखी वेगाने होऊ शकते. म्हणजेच उपग्रह हे केवळ छायाचित्र देणारे



माध्यम न राहता निर्णयप्रक्रियेतील महत्त्वाचा भाग बनेल.

या उपग्रहाचा आणखी एक महत्त्वाचा उपयोग म्हणजे शेतीसाठी आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेत शेतीचे महत्त्व लक्षात घेता, हवामानातील बदल, पाण्याची उपलब्धता, जमिनीची गुणवत्ता आणि पिकांची स्थिती यांचे अचूक निरीक्षण करणे अत्यावश्यक आहे. शेतात प्रत्यक्ष जाऊन प्रत्येक पिकाची स्थिती तपासणे शक्य नाही; मात्र उपग्रहांच्या मदतीने मोठ्या क्षेत्रावरील पिकांची वाढ, वनस्पतींची स्थिती, जमिनीतील ओलावा आणि काही प्रमाणात पिकांवरील ताण याचा अंदाज घेता येतो. यामुळे शेतीविषयक धोरणे अधिक अचूक करण्याची संधी निर्माण होते. कोणत्या भागात पिकांची स्थिती समाधानकारक आहे, पाण्याची कमतरता कुठे आहे, अतिवृष्टीचा परिणाम कुठे झाला आहे किंवा कुठल्या प्रदेशात पीकहानीची शक्यता अधिक आहे, याचा व्यापक आढावा घेता येतो. पीकविमा, नुकसानभरपाई, सिंचनाचे नियोजन आणि कृषी सल्ला या सर्व क्षेत्रांमध्ये अशा माहितीचा उपयोग होऊ शकतो.

मात्र उपग्रहातून मिळालेला डेटा शेतकऱ्यांपर्यंत आणि प्रशासनाच्या तळागाळातील यंत्रणांपर्यंत वेळेत पोहोचला पाहिजे. अंतराळातील माहिती केवळ सरकारी सर्व्हरवर किंवा संशोधन संस्थांच्या अहवालात अडकून राहिली, तर तिचा प्रत्यक्ष फायदा मर्यादितच राहील. पर्यावरणाच्या दृष्टीनेही पृथ्वीनिरीक्षण उपग्रहांचे महत्त्व मोठे आहे. जंगलांचा विस्तार कमी होणे, जलस्रोतांमध्ये होणारे बदल, किनारपट्टीची धूप, शहरीकरणाचा वाढता वेग, जमिनीच्या वापरातील बदल आणि नैसर्गिक अधिवासांवर होणारे अतिक्रमण यांचा सातत्याने मागोवा घेता येतो.

आज हवामानबदलामुळे पृथ्वीवरील अनेक परिसंस्था वेगाने बदलत आहेत. या बदलांचे दस्तावेजीकरण आणि त्याचे वैज्ञानिक विश्लेषण करण्यासाठी दीर्घकालीन उपग्रह डेटा अमूल्य ठरतो. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीनेही अशा उपग्रहांचे महत्त्व दुर्लक्षित करता येणार नाही. देशाच्या विस्तीर्ण भूसीमा आणि समुद्रकिनाऱ्यामुळे सतत देखरेख ठेवणे हे मोठे आव्हान आहे. सीमावर्ती भागातील हालचाली, समुद्री क्षेत्रातील बदल आणि संवेदनशील प्रदेशांमधील घडामोडींचे निरीक्षण करण्यासाठी उपग्रह तंत्रज्ञान हे महत्त्वाचे साधन ठरते. अर्थात, राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित उपग्रह क्षमतांचा तपशील सार्वजनिक करणे योग्य नसले, तरी आधुनिक युद्धनीती आणि सुरक्षा व्यवस्थेमध्ये अंतराळ तंत्रज्ञानाचे स्थान आता निर्णायक झाले आहे, हे निर्विवाद आहे. यामुळे भारताच्या अंतराळ कार्यक्रमाकडे केवळ वैज्ञानिक अभिमानाच्या दृष्टीने पाहण्याऐवजी त्याचा आर्थिक आणि सामाजिक परिणामही समजून घ्यायला हवा.

गेल्या काही वर्षांमध्ये भारतातील अंतराळ क्षेत्रात खासगी कंपन्यांचा सहभाग वाढला आहे. मात्र पुढील आव्हान केवळ अधिकाधिक उपग्रह अवकाशात पाठवण्याचे नाही. खरी कसोटी आहे ती अंतराळातून मिळणाऱ्या माहितीचे जमिनीवरील उपयुक्त सेवांमध्ये रूपांतर करण्याची.

उपग्रहाने शेतातील ओलावा मोजला; पण त्याचा उपयोग शेतकऱ्याला योग्य वेळी सिंचनाचा सल्ला देण्यासाठी झाला नाही, तर तंत्रज्ञानाची क्षमता अपुरी वापरली गेली असेच म्हणावे लागेल. उपग्रहाने पूरग्रस्त भागाचा अचूक नकाशा तयार केला; पण तो बचाव पथकाला वेळेत उपलब्ध झाला नाही, तरी त्या माहितीचे मूल्य कमी होते. त्यामुळे 'स्पेस डेटा टू ग्राउंड इम्पॅक्ट' ही पुढील टप्प्यातील भारताची महत्त्वाची दिशा असायला हवी. यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांच्या विविध विभागांमध्ये अधिक चांगला समन्वय आवश्यक आहे. त्याचबरोबर स्थानिक प्रशासनाला ही माहिती समजण्यास आणि वापरण्यास सक्षम करणारी यंत्रणा उभी करावी लागेल. उपग्रह डेटा, कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन आणि भौगोलिक माहिती प्रणाली यांचा एकत्रित वापर झाला तर त्याचे परिणाम अधिक व्यापक असतील.

भारताने अंतराळक्षेत्रात निश्चितच मोठी वाटचाल केली आहे. परंतु त्याचा लाभ सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनात जाणवेल, तेव्हाच अंतराळ क्षेत्राचे खरे सामर्थ्य सिद्ध होईल. हवामानाचा अचूक अंदाज, शेतकऱ्याला वेळेवर कृषी सल्ला, पूरग्रस्त नागरिकांना जलद मदत, जंगलांचे संरक्षण, जलस्रोतांचे संवर्धन आणि सुरक्षित सीमांसाठी सक्षम निरीक्षण हीच अंतराळ तंत्रज्ञानाच्या यशाची खरी मोजपपट्टी ठरेल.

भारतासाठी ही केवळ आणखी एका उपग्रहाच्या प्रक्षेपणाची कथा नाही. ही 'अंतराळातील शक्ती' आणि 'जमिनीवरील गरज' यांना जोडण्याची संधी आहे. आकाशातून पृथ्वीवर ठेवलेली ही नजर जितकी अचूक असेल, तितके देशाचे नियोजन अधिक सक्षम होईल आणि विज्ञानाचा अंतिम उद्देशही अंतराळ जिंकण्यापेक्षा पृथ्वीवरील जीवन अधिक सुरक्षित, समृद्ध आणि शाश्वत बनवणे आहे.

# मधुमेहावरील नवीन औषध

GLP-१ या पेप्टाइडपासून सेमाग्लुटाइड इंजेक्शन तयार करण्याच्या प्रयत्नांबरोबर सेमाग्लुटाइड गोळ्यांच्या स्वरूपात तोंडावाटे देता येईल का याचीही चाचपणी सुरू होती. रुग्णांना इंजेक्शन घेणं फारसं पसंत नसतं. त्यातून दीर्घकाळापर्यंत दर आठवड्याला एक इंजेक्शन घेणं रुग्णाला अजिबात आवडत नाही. मग अधलं-मधलं इंजेक्शन टाळलं जाण्याची शक्यता खूप जास्त. पण सेमाग्लुटाइड पडलं पेप्टाइड. आपल्या पचनसंस्थेतली प्रोटीएज प्रकारची विकरं अन्नातल्या प्रथिनांचं विघटन करतात तसंच या पेप्टाइड्सचंही विघटन करतात. शिवाय जठरातल्या आम्लामुळेही पेप्टाइड्सचं विघटन लवकर होतं. एवढ्या सगळ्यांशी लढून सेमाग्लुटाइड काही प्रमाणात लहान आतड्यापर्यंत पोचलं तरी तिथे आणखी अडचणी आ वासून उभ्या असतात. सेमाग्लुटाइड आकाराने मोठं. शिवाय त्याची पाण्याशी मैत्री. या दोन्ही गुणधर्मांमुळे ते आतड्याच्या पेशींभोवतीच्या चिकट द्रवातून पेशींपर्यंत पोचू शकत नाही. पोचलं तरी त्याचं आतड्यातून रक्तात शोषण अतिशय कमी प्रमाणात होतं. अशा परिस्थितीत सेमाग्लुटाइडच्या गोळ्या कितपत परिणामकारक ठरतील याची शास्त्रज्ञांना खात्री नव्हती.

इन्सुलिन आणि इतर प्रथिन/पेप्टाइड प्रकारची औषधं तोंडावाटे द्यायचे कमी प्रयत्न झाले नव्हते ! यातल्या बहुतेक औषधांना याच अडचणींना तोंड द्यावं लागलं होतं आणि 'विजयी' होणं फार कुणाला जमलं नव्हतं. तोंडावाटे दिलेल्या इन्सुलिनचं रक्तात शोषण होतं सुमारे २% तर सेमाग्लुटाइडचं १%. अशा परिस्थितीत सेमाग्लुटाइड तोंडावाटे द्यायचा प्रयत्न करणं कुणाला वेडेपणाचं वाटलं असतं. पण तरीही या सगळ्या अडचणींना सकारात्मकतेची एक किनार होती. सेमाग्लुटाइड खूप कमी डोसमध्ये परिणामकारक होतं, आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे सेमाग्लुटाइडचा परिणामकारक डोस आणि दुष्परिणाम दाखवणारा जास्त डोस, या दोहोंमधील फरक मोठा होता. म्हणजे काय तर औषध थोडं कमीजास्त शोषलं गेलं तरी लगेच मोठे दुष्परिणाम दिसायची शक्यता नव्हती. यामुळे हुरूप येऊन शास्त्रज्ञांनी सेमाग्लुटाइडच्या गोळ्या विकसित करायला सुरुवात केली.

सेमाग्लुटाइडच्या विघटनाला कारणीभूत असलेलं जठरातलं आम्ल आणि प्रोटीएज प्रकारची विकरं अन्नपचनासाठी आणि शरीरातल्या इतर जैवरासायनिक प्रक्रियांसाठी अत्यावश्यक असतात. सेमाग्लुटाइडचं विघटन होऊ नये म्हणून त्यांच्यात ढवळाढवळ करणं कठीण होतं. पेप्टाइड गटातल्या बहुतेक औषधांचा आकार मोठा असतो आणि त्यांची पाण्याशी मैत्री असते. त्याबाबतही फारसं काही करणं सोपं नव्हतं. मग शास्त्रज्ञांनी औषधाचं जठरातून रक्तात शोषण व्हावं म्हणून गोळीमध्ये SNAC हे एक विशिष्ट रसायन घातलं. सेमाग्लुटाइडची गोळी जठरात गेली की ते रसायन विरघळल्यामुळे गोळीभोवतीच्या छोट्याशा भागातली आम्लता कमी झाली. त्यामुळे सेमाग्लुटाइडचं विघटन कमी झालं. पाण्याशी वैर असलेल्या SNAC च्या संगतीमुळे सेमाग्लुटाइडची पाण्याशी मैत्री कमी झाली. मग जठराच्या पेशींमधून सेमाग्लुटाइड रक्तात शोषलं जाऊ लागलं. नाठाळ सेमाग्लुटाइड SNAC च्या सहवासामुळे सुधारलं ! ही गोळी दिवसातून एकदा घ्यावी लागते. इंजेक्शन आणि गोळ्यांचे मुख्य दुष्परिणाम मळमळ, भूक मंदावणे असे असले तरी काही रुग्णांना स्वादुपिंड, किडनी आणि डोळ्यांचे गंभीर त्रास उद्भवतात. सेमाग्लुटाइडच्या गोळ्या या औषधशास्त्रातला एक महत्त्वाचा टप्पा !

दै.नमो महाराष्ट्र हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मालक विनोद व्ही.बी.उर्फ बाळासाहेब घुईखेडकर यांनी महाराष्ट्र प्रकाशन जि.प.बिल्डीग, आर्णी रोड, येथे मुद्रीत करुन दै. नमो महाराष्ट्र कार्यालय जि.प.बिल्डींग आर्णी रोड यवतमाळ येथे प्रकाशित केले आहे. स्थापना : १९७८ Daily Namo Maharashtra
आर.एन.आय.नं.एम.एच.47117/85 पोस्ट सवलत क्रं.Ytl/107/2024-26 यवतमाळ कार्यालय : जि.प.बिल्डींग, आर्णी रोड, यवतमाळ मोबाईल नंबर 9422165689 : सर्व वाद यवतमाळ न्यायालयाअंतर्गत

# रेणुका मातेच्या दर्शनाला चला... एसटीची माहूरवारी!

## वणी आगाराची दर रविवारी तीर्थयात्रा | महिला, ज्येष्ठांसाठी ३६० रुपयांत प्रवासाची सुविधा

**नमो महाराष्ट्र | प्रतिनिधी**



**झरी जामणी** : माहूर येथील श्री रेणुका माता, श्री दत्तात्रेय मंदिर आणि श्री अनसूया माता मंदिराचे दर्शन घेण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) वणी आगारातर्फे विशेष तीर्थयात्रा बससेवा सुरू करण्यात आली आहे. दर रविवारी सकाळी ८ वाजता वणीहून बस रवाना होणार असून, भक्तांना सुरक्षित, सोयीस्कर आणि परवडणाऱ्या दरात माहूरची सफर करता येणार आहे.

माहूर हे धार्मिक श्रद्धेसोबतच निसर्ग आणि इतिहासाचा संगम असलेले महत्त्वाचे तीर्थस्थळ आहे. या प्रवासात भाविकांना श्री रेणुका माता मंदिर, श्री दत्तात्रेय मंदिर, श्री अनसूया माता मंदिर तसेच माहूरगड किल्ला आदी प्रेक्षणीय स्थळांना भेट देता येणार आहे. या तीर्थयात्रेसाठी महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी ३६० रुपये, तर सर्वसाधारण प्रवाशांसाठी ७१० रुपये प्रवास शुल्क निश्चित करण्यात आले आहे. 'अमृत' योजनेअंतर्गत पात्र प्रवाशांना मोफत प्रवासाची सुविधा असल्याचे पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

**४० प्रवाशांचा गट असल्यास स्वतंत्र बस**

किमान ४० प्रवाशांचा गट असल्यास मागणीनुसार तीर्थस्थळांच्या भेटीसाठी एसटी बस उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे कुटुंबीय, मित्रमंडळी किंवा विविध सामाजिक संस्थांना सामूहिकरीत्या माहूरची तीर्थयात्रा करता येणार आहे.

एसटी महामंडळाच्या सुरक्षित आणि अनुभवी चालकांमुळे प्रवास अधिक विश्वासार्ह ठरणार असून, ग्रामीण भागाला जोडणारी सेवा हे एसटीचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांसाठी उपलब्ध सवलतींचाही प्रवाशांना लाभ घेता येणार आहे. "चला माहूरला... भक्ती, निसर्ग आणि इतिहासाचा संगम अनुभवूया!" या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या सेवेला भाविकांचा प्रतिसाद मिळण्याची अपेक्षा आहे.

# मुकूटबनमध्ये 5 ऑक्टोबरला रेल रोको!

## प्रमुख प्रवासी गाड्यांच्या थांब्यासाठी आंदोलन : आमदार संजय देरकर करणार नेतृत्व

**नमो महाराष्ट्र | प्रतिनिधी**



**झरी जामणी** : मुकूटबन रेल्वे स्थानकावर प्रमुख प्रवासी सर्वच गाड्यांना नियमित थांबा देण्याच्या मागणीसाठी ५ ऑक्टोबर रोजी ग्रामस्थांच्या वतीने रेल रोको आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाचे नेतृत्व आमदार संजय निलकंठ देरकर करणार आहेत.

प्रमुख प्रवासी सर्वच गाड्यांना मुकूटबन येथे थांबा नसल्याने परिसरातील विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी, कर्मचारी, रुग्ण, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना रेल्वे प्रवासासाठी वणी व आदिलाबाद स्थानकांचा आधार घ्यावा लागत आहे. त्यामुळे प्रवाशांचा वेळ, पैसा आणि श्रम वाया जात असून, मुकूटबनसारख्या महत्त्वाच्या स्थानकावर प्रवासी सुविधेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

या मागणीसंदर्भात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)चे झरी जामणी तालुकाप्रमुख सतीश आदेवार, नेताजी पारखी, संदीप विचू, संकेत गझलवार यांच्या नेतृत्वाखाली अनेकांनी २६ सप्टेंबर रोजी मध्य रेल्वेच्या नागपूर मंडळाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक तसेच मुकूटबन पोलिस ठाण्याला निवेदन देण्यात आले. मुकूटबनहून धावणाऱ्या प्रमुख प्रवासी सर्वच गाड्यांना नियमित थांबा तातडीने मंजूर करावा, तसेच परिसरातील प्रत्यक्ष प्रवासी गरजांचा सर्वेक्षण करून त्यानुसार पुरेसे थांबे उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रती केंद्रीय रेल्वे मंत्रालय, मुख्यमंत्री कार्यालय, खासदार प्रतिभा धानोरकर, आमदार संजय देरकर, जिल्हाधिकारी, मुकूटबन पोलिस ठाण्यासह संबंधित रेल्वे व प्रशासकीय अधिकाऱ्यांना पाठविण्यात आल्या आहेत.

## महत्वाचे

### १ ऑक्टोबरपासून NCMC कार्ड अनिवार्य कार्डशिवाय सवलतीचे तिकीट नाही

**नमो महाराष्ट्र | प्रतिनिधी**




**झरी जामणी** : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) विविध सवलत योजनांचा लाभ घेणाऱ्या अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांसाठी १ ऑक्टोबर २०२६पासून NCMC कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे सवलतीचे तिकीट आता NCMC कार्डच्या माध्यमातूनच मिळणार आहे. Active NCMC कार्ड किंवा नोंदणीची QR कोडयुक्त पावती असलेल्या प्रवाशांना सवलतीचा लाभ घेता येईल. मात्र, QR कोडची पावती केवळ ३० दिवस ग्राह्य राहणार असून, या कालावधीत कार्ड Active करून त्यात आवश्यक रक्कम Top-up करणे बंधनकारक आहे. BHIM Appद्वारेही कार्डमध्ये रक्कम भरता येणार आहे. आधार बायोमेट्रिकमध्ये बोटांचे ठसे उमटत नसल्यास आधारशी संलग्न मोबाइल क्रमांकावर येणाऱ्या OTPद्वारे नोंदणीची सुविधा उपलब्ध आहे. कार्ड नोंदणी व वितरणासाठी अधिकृत केंद्रे, आगार व बसस्थानकांवर प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे सवलतधारकांनी गैरसोय टाळण्यासाठी मुदतीपूर्वी NCMC कार्ड नोंदणी करून घेण्याचे आवाहन एसटी महामंडळाने केले आहे.



### कलगाव मध्ये शांतमय वातावरणात गणेश विसर्जन

**नमो महाराष्ट्र | प्रतिनिधी**

**दिग्रस** : गणेशोत्सव म्हटलं की घराघरात आनंद पाहायला मिळतं. गणपती बाप्पाच्या आगमनापासून ते विसर्जनापर्यंत प्रत्येक दिवस भक्तिमय वातावरणात साजरा केला जातो. आरती, नैवेद्य, पूजा, प्रसाद आणि बाप्पाच्या दर्शनासाठी येणाऱ्या पाहुण्यांमुळे घरात चैतन्य निर्माण होतं. मात्र गणेश विसर्जनाचा दिवस जवळ आला की आनंदासोबतच बाप्पाला निरोप देण्याची भावुकताही मनात दाटून येते.'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' असा जयघोष करत भक्तगण आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप देतात. दिग्रस शहरात काल संकटाचतुर्थी च्या दिवशी विसर्जन पार पडले त्यानंतर ग्रामीण भागात दुसऱ्या दिवशी पाडत असते तालुक्यातील कलगाव येथे डीजे आणि डॉल्बी यावर जिल्हा प्रशासनाने पुर्णता बंदी घातली असल्याने त्याची अंबलबजावणी करण्यात आली. तालुक्यात दिग्रस पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक वैजनाथजी मुंडे साहेब यानी डीजे चा एक बॉक्स ही वाजू देणार नाही असे सांगितले होते. कुठेही डीजे वाजू दिला नाही आणि वाजला पण नाही . ढोल ताश्याच्या गजरात विसर्जन मिरवणूक सायंकाळी 4 ते 5 च्या दरम्यान सुरवात होऊन मोठ्या भक्तीमय वातावरणात मिरवणूक मार्गाने व शांततेत पार पडली पोलीस प्रशासनाच्या हाकेला ओ देत गणेश मंडळानी प्रतिसाद दिला यंदा जाणता राजा आणि शिवछत्रपती गणेशउत्सव मंडळानी ध्वनी प्रदूषण टाळले डीजे वर बंदी असल्यामुळे मिरवणुकीत अबाल वृद्धाचा गर्दी पाहवयास मिळाली सहभाग ढोल ताश्याच्या रेट मध्ये प्रचंड वाढ दिसून आली.गावातील नागरिक उपस्थित होते.

### वडगाव पोलीस ठाण्यात गणेशोत्सव उत्साहात

**नमो महाराष्ट्र | प्रतिनिधी**

**अकोला बाजार** : वडगाव पोलीस ठाण्यात यंदाचा गणेशोत्सव भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. शनिवारी गणरायाला भावपूर्ण निरोप देत वाजत-गाजत विसर्जन मिरवणूक काढण्यात आली. या निमित्ताने पोलीस जमादार म्हणून प्रदीर्घ सेवा बजावून सेवानिवृत्त झाल्याबद्दल प्रेमदास फुल्लूके यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वडगाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार विकास दांडे होते. प्रमुख अतिथी म्हणून पोलीस पाटील रुपेश सावरकर, योगेश वर्मा, पोलीस उपनिरीक्षक भाऊराव बोकडे, पोलीस उपनिरीक्षक गणेश आगे तसेच मुख्याध्यापक मंजुषा आगे उपस्थित होते. यावेळी सेवानिवृत्त पोलीस जमादार प्रेमदास फुल्लूके यांच्या प्रदीर्घ सेवेला उपस्थितांनी शुभेच्छा देत त्यांच्या पुढील आयुष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. पोलीस दलात कर्तव्य बजावताना त्यांनी दिलेल्या योगदानाचा यावेळी गौरव करण्यात आला.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने पोलीस ठाण्यात धार्मिक वातावरण निर्माण झाले होते. गणेशमूर्तीची विधिवत पूजा-अर्चा झाल्यानंतर सर्व उपस्थितांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

# आर्णी येथे हॉकीपटु तनुश्री कडु हिचा सत्कार

**नमो महाराष्ट्र | प्रतिनिधी**



**आर्णी** : चीन मधील मोकी येथे झालेल्या आशियाई स्पर्धेत भारतीय ज्युनियर महिला हॉकी संघाने सहभागी होऊन विजय मिळवुन सुवर्णपदक पटकावले. या ऐतिहासिक विजयामध्ये आर्णी तालुक्यातील सायखेडा लिंगी येथील तनुश्री दिनेश कडु हिने उत्कृष्ट खेळत देशाच्या विजयात मोलाचे योगदान दिल्याबद्दल तिचा अखिल भारतीय कुणबी, मराठा, देशमुख समाजाच्या वतीने देऊरवाडी पुनर्वसन येथे सत्कार समारंभाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मनिष पाटील हे होते. सत्कारमूर्ती तनुश्री कडु तर प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय अधिकारी गंगाधर होवाळे , तहसीलदार वैशाख वाहुरवाघ, सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी किशोर रावते, संदिप बुटले, विलास राऊत आबिद फानन हे होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महेश बुटले यांनी केले.त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष मनिष पाटील, सायकलिंग क्लब, मराठा महासंघ, वकील संघ, पत्रकार याच्या वतीने तनुश्री कडु हिचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर मान्यवरांचे मार्गदर्शन झाले. शेवटी तनुश्री कडु हिचे मनोगत झाले तिने सांगितले की मला लहानपणापासून खेळाची आवड होती मी माझ्या मैत्रिणीसोबत खेळत असत. मी पाचवीत असताना हॉंकी हा खेळ निवडला. मी खेळाचा सराव करत होती. माझ्या घरची परिस्थिती गरीबीची होती परिस्थितीवर मात करत करत पुढे जात होती . वैयक्तिक जिध्दी शिवाय पुढे जाऊ शकत नाही. मला शिक्षकाचे मार्गदर्शन वेळोवेळी मिळले त्यामुळे आज मी ईथ पर्यंत पोहचली. असे तिने सांगितले. या कार्यक्रमाचे संचालन कुणाल मनवर यांने केले तर आभार प्रदर्शन प्रमोद चौधरी . यांनी केले तर या कार्यक्रमाला मनोज चारोडे अँड प्रमोद चौधरी प्रविण मंदुलवार संदिप ढोले सचिन शिंदे प्रमोद पठाडे सुनिल राणे, अँड इरफान चव्हाण, अँड गजानन ठाकरे, अँड जावेद शेख, अँड शोयब मलनस ईत्यादी मान्यवर उपस्थित होते

# राळेगाव तालुक्यातील भांब येथील अंगणवाडी केंद्रात सप्टेंबर २०२६ पोषण माह कार्यक्रम उत्साहात साजरा

**नमो महाराष्ट्र | प्रतिनिधी**

**राळेगाव** : एकात्मिक बालविकास प्रकल्प राळेगाव अंतर्गत भांब येथील अंगणवाडी केंद्रात दिनांक २३ सप्टेंबर २०२६ रोजी पोषण माह व सेवा संकल्प अभियानाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. सागर विठाळकर बाल विकास प्रकल्प अधिकारी राळेगाव तसेच प्रमुख अतिथी म्हणून तालुका समन्वयक रूपेश रेंगे उपस्थित होते, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून व दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली, त्यानंतर मान्यवरांनी उपस्थित महिलांना व किशोरवयीन मुलींना मार्गदर्शन केले, अंगणवाडी मध्ये विविध प्रकारचे आहार प्रात्यक्षिक ठेवण्यात आले होते, तसेच किशोरवयीन मुलींना मार्गदर्शन, सुपोषन,हात धुणे ,आहाराचे महत्त्व, आरोग्याची काळजी, बालविवाह रोखण्यासाठी विशेष मार्गदर्शन, स्तनपान विषयक माहिती, गर्भवती महिलांना मार्गदर्शन,स्तनदा मातांना मार्गदर्शन, इत्यादी विषयांवर मान्यवरांनी मार्गदर्शन करण्यात ,कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंजली कुबडे अंगणवाडी सेविका भांब यांनी केले, यावेळी गायत्री सलोटे,जयश्री कुबडे,स्वाती शिवणकर, पुजा कोवे, अश्विनी मोहदुरे,माया खुडसंगे, सोनु कुत्रे, कल्याणी झाडे,कांचन कोवे, वंदना कोयताडे,आचल झाडे, ज्ञानेश्वरी उईके, मदतनीस सोनु विशाल कुमरे तसेच गावातील मोठ्या संख्येने महिला बालके विद्यार्थी उपस्थित होते.

# बिल दुरुस्तीला नकार; स्मार्ट मीटरसाठी ग्राहकांना तगादा

**नमो महाराष्ट्र | प्रतिनिधी**

**राळेगाव** : महावितरणकडून ग्राहकांना आकारण्यात येणाऱ्या चुकीच्या व सरासरी वीजबिलांच्या दुरुस्तीला टाळाटाळ केली जात असून, त्याचवेळी स्मार्ट मीटर बसविण्यासाठी ग्राहकांवर दबाव टाकला जात असल्याची तक्रार राळेगाव तालुक्यातील ग्राहकांकडून करण्यात येत आहे. स्मार्ट मीटर सध्या ग्राहकांसाठी बंधनकारक नसल्याचा दिलासा मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला असतानाही महावितरणचे अधिकारी व कर्मचारी स्मार्ट मीटरसाठी आग्रह धरत असल्याने ग्राहकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

मीटर रीडिंग घेण्यासाठी येणारे कर्मचारी अनेकदा प्रत्यक्ष रीडिंग न घेता घराला कुलूप असल्याचे किंवा मीटर नादुरुस्त असल्याचे दाखवित असल्याचा आरोप ग्राहकांनी केला आहे. प्रत्यक्षात मीटर व्यवस्थित सुरू असून, कोणतीही थकबाकी नसतानाही काही ग्राहकांना सरासरी पद्धतीने जास्त रकमेची बिले आकारली जात असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे बिल दुरुस्तीसाठी ग्राहक महावितरणच्या कार्यालयात धाव घेत आहेत. मात्र, कार्यालयात गेल्यानंतर ग्राहकांना समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याची तक्रार आहे. 'आता तुमचे बिल दुरुस्त होणार नाही', तसेच 'स्मार्ट मीटर लावा', असा सल्ला अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून दिला जात असल्याचे ग्राहकांचे म्हणणे आहे. काही कर्मचाऱ्यांकडून वरिष्ठांकडून स्मार्ट मीटर बसविण्याच्या सूचना असल्याचे सांगितले जात असल्याने ग्राहकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. दरम्यान, स्मार्ट मीटर अथवा प्रीपेड मीटर ग्राहकांना बंधनकारक नसून ते ऐच्छिक असल्याचा दावा ग्राहकांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे चुकीची अथवा सरासरी बिले आधी दुरुस्त करावीत आणि त्यानंतरच मीटरबाबत ग्राहकांना माहिती द्यावी, अशी मागणी होत आहे.

मीटर रीडिंगमध्ये होणाऱ्या त्रुटींमुळे ग्राहकांना वाढीव बिलांचा भुर्दंड सहन करावा लागत असल्याचा आरोप आहे. बिल दुरुस्तीला नकार देऊन स्मार्ट मीटरसाठी आग्रह का धरला जात आहे, असा सवाल ग्राहकांनी उपस्थित केला असून, संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून ग्राहकांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

# संघर्षातून यश मिळविणा-या शिक्षकांचा सहयोग ग्रुपकडून गौरव

**नमो महाराष्ट्र | प्रतिनिधी**



**मुकुटबन** : सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांसाठी कार्यरत असलेल्या सहयोग ग्रुपच्या माध्यमातून जिल्हा परिषद शाळांमध्ये नवनियुक्त झालेल्या शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन, परीक्षेच्या तयारीसाठी मदत तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्याची परंपरा सहयोग ग्रुपने कायम ठेवली आहे.

या उपक्रमांतर्गत मुकुटबन येथील मनिषा तिपर्तीवार, लिंगटी येथील आशिक शेख, कोसारा येथील समीर गांवडे आणि रोशन भोयर यांचा सत्कार करण्यात आला. सहयोग ग्रुपचे सदस्य, निसर्ग पर्यावरण मंडळाचे कोषाध्यक्ष, कवी, लेखक तसेच आदर्श शिक्षक विपीन वडके यांचाही यावेळी विशेष गौरव करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना नवनियुक्त शिक्षकांनी स्पर्धा परीक्षेच्या तयारीतील आपला संघर्ष आणि अनुभव मनोगतातून व्यक्त केला. यावेळी सुरेंद्र गेडाम आणि गणेश बुट्टे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गजानन गद्दलवार यांनी केले, तर पंकज जाधव यांनी आभार मानले. कार्यक्रमाला सहयोग ग्रुप व निसर्ग पर्यावरण मंडळाचे अध्यक्ष सुरेंद्र गेडाम, विपीन वडके, केतन ठाकरे, वामन बाडलवार, लोकनाथ खडसे, विलास देवढगले, सुधाकर नरांजे, नितेश भालेराव, संदीप धोटे, प्रेमानंद ऐलमावार, निलेश भोयर, अनिल चव्हाण, राहुल ठाकरे, सुधाकर गांवडे, पवन साबळे, माधव चाटे, वसंता उदकवार, प्रशांत भगत, संदीप पोटरकर, चंद्रशेखर चौधरी, चितेंश्वर वैद्य, माधव उदार, विपीन वासाड, रमेश वैद्य, किशोर भोयर, प्रफुल कडू तसेच आरसीसीपीएलचे महेंद्र ठेंबरे उपस्थित होते.

# खुल्या मिठाईसह पॅकिंग दूध-दह्याचे नमुने घेतले; नागपूरच्या प्रयोगशाळेत होणार तपासणी

**नमो महाराष्ट्र | प्रतिनिधी**



**झरी जामणी** : अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) पथकाने शनिवारी (२६ सप्टेंबर) दुपारी मुकूटबन बाजारपेठेत अचानक दुसऱ्यांदा धडक देत दोन खाद्यपदार्थ विक्री केंद्रांची तपासणी केली. या कारवाईदरम्यान पॅकिंग केलेले दूध, दही आणि खुले पेढे, खवा आणि मोतीचूर लाडू यांचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले. हे नमुने नागपूर येथील प्रयोगशाळेत पाठविण्यात येणार त्यानंतरच गुणवत्तेबाबत स्पष्टता होणार आहे.

यवतमाळ येथील अन्न व औषध अधिकारी डॉ. सचिन नरवाडे व त्यांचे सहकारी अरविंद पिंपळकर यांनी दुपारी १२ वाजताच्या सुमारास मुकूटबन येथील मशीद चौकातील डेली निडस दुकानाची तपासणी केली. तेथील पॅकिंग दूध व दह्याची पाहणी करून दोन्ही पदार्थांचे नमुने घेण्यात आले. यानंतर पथकाने बसस्टँड चौकातील पुरोहित श्री बिकानेर स्वीट मार्टची तपासणी केली. येथील मिठाईची पाहणी करताना २ किलो पेढे, २ किलो मोतीचूर लाडू आणि १ किलो खवाचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले. या नमुन्यांचा प्रयोगशाळा अहवालानंतरच संबंधित खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेबाबत स्पष्टता होणार आहे.

### अधिकाऱ्यांची चाहूल लागताच दुकाने बंद?

एफडीएचे पथक बाजारपेठेत दाखल झाल्याची माहिती पसरताच काही संबंधित दुकाने काही मिनिटांत बंद झाल्याचे दिसून आले. अचानक तपासणीच्या वेळी दुकाने बंद होण्याच्या प्रकाराकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. मात्र, दुकाने नेमक्या कोणत्या कारणामुळे बंद करण्यात आली, याबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

### एका महिन्यांत दुसरी कारवाई ....

मुकूटबनमध्ये अन्न व औषध प्रशासनाची ही दुसरी कारवाई आहे. यापूर्वी २२ ऑगस्ट रोजी एफडीएच्या पथकाने मुकूटबन येथे कारवाई केली होती. यावेळेस अस्वच्छतेमुळे पुरोहित श्री बिकानेर स्वीट मार्ट चा परवाना निलंबित केला होता. त्यामुळे बाजारपेठेतील खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेवर प्रशासनाचे लक्ष असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### दिवाळीत तपासणीची मागणी

तेल, दूध, तूप, खवा यासह अन्नपदार्थांच्या कच्च्या मालाची नियमित तपासणी करून नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई करावी. दिवाळीतही ही तपासणी मोहीम राबवावी, अशी नागरिकांची मागणी आहे.

# डी.जे. व बॅन्जोमुक्त गणेश विसर्जनातून ७५ मंडळांचा आदर्श

## मुकूटबन पोलिस ठाणे हद्दीत शांतता, शिस्त आणि भक्तीचा संगम : काही मंडळांनी जमा रक्कम गमावूनही घेतला निर्णय

•नमो महाराष्ट्र प्रतिनिधी



**झरी जामणी :** गणेश विसर्जन म्हटले की कानठळ्या बसविणारा डी.जे., बॅन्जो आणि जल्लोषाचे वातावरण, असे चित्र आता सर्वसामान्य झाले आहे. मात्र, मुकूटबन पोलिस ठाणे हद्दीतील तब्बल ७५ गणेश मंडळांनी डी.जे. व बॅन्जोला फाटा देत पारंपरिक वाद्यांच्या गजरात गणरायाला निरोप देऊन समाजासमोर वेगळा आदर्श ठेवला. विशेष म्हणजे, काही मंडळांनी डी.जे. व बॅन्जोसाठी सहा महिन्यांपूर्वीच आगाऊ रक्कम दिली होती. मात्र, पोलिस प्रशासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत त्यांनी आर्थिक नुकसान सोसूनही डी.जे. न वाजविण्याचा निर्णय घेतला.

मुकूटबन पोलिस ठाणे हद्दीत ६४ गावांमध्ये ७५ गणेशमूर्तींची स्थापना करण्यात आली होती. त्यापैकी मुकूटबन शहरात १९, तर ग्रामीण भागात ५६ गणेश मंडळे होती. विशेष म्हणजे ३० गावांनी 'एक गाव, एक गणपती' उपक्रम राबवत सामाजिक एकोपा व बंधुभावाचा संदेश दिला. गणेशोत्सवाच्या काळातच ठाणेदार सतीश जाधव यांनी गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून डी.जे. व बॅन्जोचा वापर टाळण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला मंडळांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यामुळे विसर्जन मिरवणुका डी.जे.मुक्त आणि नशामुक्त वातावरणात पार पडल्या. मुकूटबन शहरातील बसस्थानक चौकातील 'मुकूटबनचा राजा' गणपतीचे विसर्जन ग्रामीण भागातील महिला भजन मंडळांच्या सहभागातून करण्यात आले. भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या विसर्जनाने पारंपरिक संस्कृतीला उजाळा मिळाला.

कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी ठाणेदार सतीश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक सुदाम आसोरे, मुकुटबन बीट अधिकारी अमित पोयाम, अडेगांव बीट अधिकारी प्रकाश गोर्लेवार, घोंसा बीट अधिकारी दीपक ताठे, मार्की सोनेगांव बीट अधिकारी दिलीप जाधव, खुफिया पोलीस बादल जाधव, वाहतूक शाखाचे महेश राठोड, आसिफ शेख, चालक रवी ईसनकर, विनोद नागरगोजे तथा पोलिस कर्मचारी व होमगार्ड यांनी विसर्जन मिरवणुकांमध्ये सहकार्य केले. डी.जे. चा आवाज नाही, नशेचा थाट नाही; भक्ती, शिस्त आणि सामाजिक सलोख्याला प्राधान्य, असा संदेश या विसर्जनातून देण्यात आला. 'उत्सव भक्तीचा, जबाबदारी प्रत्येकाची' हा संदेश प्रत्यक्ष कृतीत उतरवत ७५ गणेश मंडळांनी घेतलेला हा निर्णय निश्चितच चर्चेचा विषय ठरला आहे.

# महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्याचा बिल दुरुस्तीचा नकार परंतु स्मार्ट मीटर घेण्यासाठी ग्राहकांना तगादा

•नमो महाराष्ट्र प्रतिनिधी

**राळेगाव :** स्मार्ट मीटर सध्या कोणत्याही ग्राहकांना बंधनकारक नसल्याचा मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिलासा दिला असला तरी महावितरण चे अधिकारी कर्मचारी बिल दुरुस्तीचा नकार देऊन स्मार्ट मीटर बसविण्यासाठी ग्राहकांना तगादा लावत असल्याची ओरड सध्या ग्राहकांमधून केली जात महावितरण कंपनीतील मीटर रिडींग नेणारे कर्मचारी हे मीटर चे रीडिंग न घेता घराला लॉक दाखवून किंवा मिटर नादुरस्त दाखवून देतात मात्र ग्राहकांचे मीटरचे रीडिंग नियमित चालू असताना व बिलाची कोणतीही रक्कम थकीत नसताना महावितरण कडून सरासरी बिल आकारले जाते मात्र ही बिलाची रक्कम जास्त असल्याने ग्राहक बिल दुरुस्ती करिता महावितरणच्या कार्यालयात जातात मात्र येथील अधिकारी कर्मचारी त्यांना सन्मानाची वागणूक न देता तुमचे बिल आता दुरुस्त होणार नाही आता तुम्ही स्मार्ट मीटर लावा अशी सल्ला देत आहे आम्ही जरी इथून दुरुस्ती केले तरी वरिष्ठांकडून हे बिल दुरुस्त होत नाही असेही सांगितले जात आहे त्याचबरोबर आम्हाला आता स्मार्ट मीटर लावण्याचे वरिष्ठाकडून सांगण्यात आले आहे त्यामुळे महावितरण च्या अधिकारी कर्मचाऱ्याकडून ग्राहकांना नवीन स्मार्ट मीटर बसवण्यासाठी सतत तगादा लावला जात आहे तरी संबंधित विभागांनी याकडे लक्ष देऊन ग्राहकांचे बिल दुरुस्ती करून स्मार्ट मीटर बसविण्याचा तगादा लावू नये अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

महावितरणकडून चुकीची किंवा सरासरी बिले आकारली जात असल्याचा आरोप ग्राहक करीत आहेत. जेव्हा ग्राहक ही बिले दुरुस्त करण्यासाठी कार्यालयात जातात, तेव्हा अधिकारी दाद देत नाहीत किंवा तांत्रिक कारणे पुढे करून बिले दुरुस्त करण्यास नकार देतात.

स्मार्ट मीटर बसविण्याला ग्राहकांनी मोठा विरोध केला होता यावर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नागरिकांना दिलासा देणारा खुलासा केला असून प्रीपेड मीटर कोणत्याही ग्राहकांना बंधनकारक करण्यात आले नाही .ते ऐच्छिक आहे व ग्राहकांना ते नाकारण्याचा अधिकार आहे. असे असताना महावितरणचे अधिकारी कर्मचारी स्मार्ट मीटर लावण्यास तगादा लावत आहेत

रीडिंग नेणाऱ्यांच्या चुकीमुळे ग्राहकांना सरासरी आकारले जाते वीजबिल रीडिंग घेणाऱ्यांच्या चुकीमुळे बिलात होणाऱ्या वाढीबाबत विचारणा केली असता, बिलात दुरुस्ती करण्यास नकार दिला जात आहे व स्मार्ट मीटर घेण्यास आग्रही करत आहे त्यामुळे हे ग्राहकांना मान्य नसतानाही आग्रह कशासाठी असा प्रश्न ग्राहक करीत आहे.

## SHORT NEWS

### आश्रमशाळेत वृक्षारोपणासह विद्यार्थ्यांची आरोग्य व रक्त तपासणी



•नमो महाराष्ट्र प्रतिनिधी

**झरी जामणी :** औषधोपचाराच्या साखळीत डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून फार्मासिस्टची भूमिका अधोरेखित करत केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन, झरी जामणीच्या वतीने जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. माथार्जुन येथील शासकीय माध्यमिक आश्रमशाळेच्या परिसरात वृक्षारोपण, विद्यार्थ्यांची आरोग्य व रक्त तपासणी, मोफत औषधवाटप आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

माथार्जुन परिसरात विविध फळझाडांची लागवड करण्यात आली. विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून मोफत औषधे देण्यात आली. माथार्जुनसह राजीव आश्रमशाळा आणि जिल्हा परिषद हायस्कूल, पाटण येथील विद्यार्थ्यांना फळे, बिस्किटे व शैक्षणिक किटचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिनेश पिपाडा यांनी केले. असोसिएशनचे अध्यक्ष शेख मुजीम यांनी उपक्रमामागील भूमिका स्पष्ट करून आभार मानले. उपाध्यक्ष गजेंद्र दरबेशवार, सचिव सुशील मालेकर, नरेश कासावार, रामानंद मोहितकार, सचिन अंगलवार, अल्केश उरकुडे, संकेत कडुकर, सैय्यद फय्याज तसेच डॉ. गजानन मरस्कोल्हे, मडावी ताई आणि तिन्ही शाळांतील शिक्षकांचे सहकार्य लाभले.

### गणित विषयावर एकदिवसीय कार्यशाळा



•नमो महाराष्ट्र प्रतिनिधी

**राळेगाव :** विद्यार्थ्यांमध्ये विश्लेषणात्मक विचारसरणी वाढवण्यासाठी आणि गणिताचा दैनंदिन जीवनातील वापर समजून घेण्यासाठी, इंदिरा गांधी कला महाविद्यालय, राळेगाव येथील गणित विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता आश्वासन कक्ष (IQAC) यांच्या संयुक्त विद्यमाने २४ सप्टेंबर २०२६ रोजी "गणितातील समस्या निवारण" (Problem Solving in Mathematics) या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आणि "गणिताचे उपयोजन" (Mathematical Applications) या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. एल. बर्डे सर होते, तर मंचावर आय.क्यू.ए.सी. (IQAC) समन्वयक डॉ. के. डी. जगताप उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. बर्डे यांनी दैनंदिन जीवनातील अडचणी सोडवण्यासाठी गणितीय तर्काचे महत्त्व पटवून दिले आणि विद्यार्थ्यांनी संकल्पना स्पष्ट करण्यावर भर द्यावा असे आवाहन केले. प्रा. अक्षय पी. जेनेकर (कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मारेगाव) यांनी कार्यशाळेदरम्यान क्लिष्ट गणितीय प्रश्न सहजपणे सोडवण्यासाठी विविध सोप्या पद्धती, शॉर्टकट ट्रिक्स आणि प्रभावी तंत्रे विद्यार्थ्यांना शिकवली. प्रा. एम. जी. भुजाडे (लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी) यांनी चर्चासत्रात विज्ञान, तंत्रज्ञान आणि विविध उद्योगांमध्ये गणिताचा प्रत्यक्ष कसा वापर केला जातो, यावर सखोल व मार्गदर्शक व्याख्यान दिले.

# १ ऑक्टोबरपासून NCMC कार्ड अनिवार्य कार्डशिवाय सवलतीचे तिकीट नाही

•नमो महाराष्ट्र प्रतिनिधी




**झरी जामणी :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) विविध सवलत योजनांचा लाभ घेणाऱ्या अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांसाठी १ ऑक्टोबर २०२६पासून NCMC कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे सवलतीचे तिकीट आता NCMC कार्डच्या माध्यमातूनच मिळणार आहे.

Active NCMC कार्ड किंवा नोंदणीची QR कोडयुक्त पावती असलेल्या प्रवाशांना सवलतीचा लाभ घेता येईल. मात्र, QR कोडची पावती केवळ ३० दिवस ग्राह्य राहणार असून, या कालावधीत कार्ड Active करून त्यात आवश्यक रक्कम Top-up करणे बंधनकारक आहे. BHIM Appद्वारेही कार्डमध्ये रक्कम भरता येणार आहे. आधार बायोमेट्रिकमध्ये बोटांचे ठसे उमटत नसल्यास आधारशी संलग्न मोबाइल क्रमांकावर येणाऱ्या OTPद्वारे नोंदणीची सुविधा उपलब्ध आहे. कार्ड नोंदणी व वितरणासाठी अधिकृत केंद्रे, आगार व बसस्थानकांवर प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे सवलतधारकांनी गैरसोय टाळण्यासाठी मुदतीपूर्वी NCMC कार्ड नोंदणी करून घेण्याचे आवाहन एसटी महामंडळाने केले आहे.

# कुष्ठरोग रूग्ण शोधासाठी आजपासून मोहीम : घरोघरी सर्वेक्षण



•नमो महाराष्ट्र प्रतिनिधी

**झरी जामणी :** यवतमाळ जिल्ह्यात २८ सप्टेंबर ते १४ ऑक्टोबरदरम्यान कुष्ठरोग शोध मोहीम राबविण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने झरी-जामणी तालुक्यात तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मोहन गेडाम यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय अधिकारी जीवन कुडमेथे, कुष्ठरोग तंत्रज्ञ रवि गडलिंग, आरोग्य सहायक भाकरे, निलेश सोनोने, सुवर्णा काळे, आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका व पुरुष स्वयंसेवकांचे प्रशिक्षण घेण्यात आले.

तालुक्यातील तीन प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या कार्यक्षेत्रात घरोघरी सर्वेक्षण केले जाणार आहे. मोहिमेसाठी तालुका समन्वय समिती गठित करण्यात आली असून, गावागावांत प्रभातफेरी, दवंडी आणि जनजागृतीद्वारे नागरिकांना कुष्ठरोगाच्या लक्षणांची माहिती दिली जाणार आहे. निदान न झालेले रुग्ण शोधून त्यांना तातडीने बहुविध औषधोपचार सुरू करणे, हा मोहिमेचा उद्देश आहे. त्वचेवर फिकट किंवा लालसर, न खाजणारा व बधिर चट्टा, त्वचेवर गाठी, कानाच्या पाळ्या जाड होणे, भुवयांचे केस विरळ होणे, तळहात-तळपायाला मुंग्या येणे किंवा हातातून वस्तू गळून पडणे, ही कुष्ठरोगाची प्रमुख लक्षणे आहेत. कुष्ठरोगावरील उपचार शासकीय रुग्णालयांत मोफत उपलब्ध असून रुग्णाची गोपनीयताही राखली जाते. त्यामुळे नागरिकांनी कोणतीही भीती किंवा संकोच न बाळगता सर्वेक्षणासाठी येणाऱ्या आरोग्य पथकांना अचूक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन डॉ. मोहन गेडाम यांनी केले.

# ढोल-ताशांच्या गजरात गणरायाला भावपूर्ण निरोप



•नमो महाराष्ट्र प्रतिनिधी

**फुलसावंगी :** गणेशोत्सवाच्या उत्साहपूर्ण वातावरणानंतर लाडक्या गणरायाला भक्तिभावाने निरोप देण्यात आला. फुलसावंगी शहरातील विविध गणेश मंडळांनी पारंपरिक वाद्यांच्या तालावर, ढोल-ताशांच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात विसर्जन मिरवणुका काढल्या. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

विविध मंडळांच्या गणेशमूर्तींच्या मिरवणुकीत युवकांसह महिला व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. पारंपरिक वाद्यांना प्राधान्य देत शिस्तबद्ध पद्धतीने मिरवणुका पार पडल्या. ठिकठिकाणी नागरिकांनी गणरायाचे दर्शन घेत बाप्पाला भावपूर्ण निरोप दिला.

पोलिसांच्या नियोजनबद्ध बंदोबस्तामुळे विसर्जन शांततेत गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर फुलसावंगी पोलिसांकडून चोख बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आले होते. मिरवणूक मार्गावर पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. वाहतूक सुरळीत राहावी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांकडून विशेष खबरदारी घेण्यात आली. पोलिसांच्या नियोजनबद्ध बंदोबस्तामुळे गणेश विसर्जन मिरवणुका शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्या. नागरिकांनीही पोलिस प्रशासनाला सहकार्य करत गणेशोत्सवाची सांगता शांततेत केली.

# बाभूळगाव उर्दू शाळेत चौथीच्या विद्यार्थ्यांची चमक; पालक सभेत कौतुकाचा वर्षाव

•नमो महाराष्ट्र प्रतिनिधी



**बाभुळगाव :** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक उर्दू शाळा, बाभूळगाव येथे आज, दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांची पालक सभा उत्साहात संपन्न झाली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या सर्वांगीण विकासाबाबत या सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली.या पालक सभेत इयत्ता चौथीचे वर्गशिक्षक मोहम्मद अखलाक यांनी विशेष पुढाकार घेत आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांची उत्तम तयारी करून घेतली. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या विविध Teaching Aids (शैक्षणिक साहित्याचे) सादरीकरणाने पालकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. या शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल असलेली आवड, त्यांची कल्पकता तसेच विविध कलागुण पालकांसमोर आले. विद्यार्थ्यांचे सादरीकरण पाहून पालकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. आपल्या पाल्यांनी घेतलेली मेहनत आणि आत्मविश्वासाने केलेले सादरीकरण पाहून अनेक पालक भावूक झाले. विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी सावर येथील उच्च प्राथमिक उर्दू शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व शिक्षणतज्ज्ञ बाभूळगाव येथील उर्दू शाळेत उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या शैक्षणिक साहित्याची पाहणी केली तसेच विद्यार्थ्यांशी संवाद साधत या साहित्याबाबत विविध प्रश्न विचारले. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांनी कोणतीही भीती न बाळगता प्रत्येक प्रश्नाचे आत्मविश्वासाने उत्तर दिले.

पान १ वरुन

### सोलर प्रा.लि. च्या गोदामात चोरी

, ४ सी × १० स्क्वेअर मिमी अल्युमिनियम केबल - ४० मीटर, २ सी × २.५ स्क्वेअर मिमी कॉपर आर्मर्ड केबल - १०१ मीटर, ३ सी × २.५ स्क्वेअर मिमी कॉपर केबल - ७५ मीटर व ५० मीटर, ७ सी × २.५ स्क्वेअर मिमी कॉपर केबल - ५० मीटर १० सी × २.५ स्क्वेअर मिमी कॉपर केबल - ६३ मीटर, १०. १२ सी × २.५ स्क्वेअर मिमी कॉपर केबल - ६८ मीटर, १६ सी ते २४ सी पर्यंतच्या विविध कॉपर केबल्स (१५९ ते ३७ मीटर दरम्यान), लॅन केबल (कॅट-६ केबल) - ३०० मीटर बॅटऱ्या (१२ व्होल्ट, १०० अॅम्प्ीअर) - २२ नग अशा प्रकारे वेगवेगळ्या प्रकारच्या महागड्या केबल्स, कॉपर साहित्य आणि मोठ्या प्रमाणावर बॅटऱ्या असा एकूण २,५०,००० रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी चोरून नेला आहे. या प्रकरणी कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

### यंदाचा गणेशोत्सव ठरला खऱ्या अर्थाने...

उत्सवात चोख पहारा देत, २४ ते २६ सप्टेंबरदरम्यान भावपूर्ण निरोप दिला. कायदा व सुव्यवस्था राखत गणेशोत्सवाचे काटेकोर नियोजन केले. नागरिकांचे आरोग्य, विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि ज्येष्ठांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाने घेतलेली ही भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली. डीजेच्या दणदणाटाऐवजी पारंपरिक ढोल-ताशा, लेझीम आणि संबळ यांसारख्या लोकवाद्यांच्या गजरात निघालेल्या मिरवणुकीने सर्वांचेच मन जिंकले. यवतमाळ ग्रामीण पोलिस ठाण्याचे ठाणेदार प्रवीण मानकर व त्यांच्या सहका-याने चोख भूमिका बजावली.

### भटक्या कुत्र्यांचा अक्षरशः आतंक!

पाठलाग करणे तसेच लहान मुलांवर धावून जाण्याचा घटना घडत असल्याचा नागरिकांचा आरोप आहे ,एका चिमुकलीच्या चेहऱ्यावर गंभीर जखम झाल्यामुळे नागरिकांमध्ये संताप आणि भीती दोन्ही निर्माण झाले आहे .आज एका बालिकेवर हल्ला झाला उद्या आणखी एखाद्या मुलीला किंवा नागरिकांचा जीव धोक्यात येऊ नये यासाठी मोकाट कुत्र्यांचा प्रश्नावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी होत आहे मोठी दुर्घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा त्याआधीच प्रशासनाने कठोर पावले उचलावीत अशी अपेक्षा वनी शहरातील नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

### विना परवाना स्फोटकांचा खेळ; चौघांचा बळी!

बाळगण्याचा अथवा वापरण्याचा परवाना नसताना त्यांच्याकडे स्फोटके होती. ढाणकी येथील बळीराम नरवाडे याने त्यांना स्फोटके पुरविल्याचे फिर्यादीत नमूद आहे. पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम १०५, २८८, स्फोटक पदार्थ अधिनियम १८८४ मधील कलम ९(१)(ब) तसेच स्फोटक पदार्थ अधिनियम १९०८ मधील कलम ५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी गौरव कायंदे-पाटील करीत आहेत.

तामिर ए मिल्लत मल्टिपर्पज सोसायटी भुसा रोड यवतमाळ द्वारा दैनिक नमो महाराष्ट्र मध्ये दिनांक सोमवार , 21 सितंबर 2026 रोजी जी सार्वजनिक सूचना देण्यात आली आहे ती पूर्णपणे चुकीची असून Wings Public School E/M नावात कोणताही बदल करण्यात आला नाही. तसेच सदर शाळा (Ray of Hope Educational and Welfare Multipurpose Society Pandharkawada) द्वारा संचलित असून शाळा संबंधी सर्व पत्रव्यवहार, अर्ज व कामकाजासाठी अध्यक्ष / सचिव Ray of Hope Educational and Welfare Multipurpose Society Pandharkawada, F-21441 (Yavatmal) Email ID: rayofhope5151@gmail.com यांना संपर्क करावा.

# शिक्षक पतसंस्थेची ४३ वी वार्षिक आमसभा उत्साहात

## सभासदांना १४.५० टक्के लाभांश; मासिक ठेवींवर १० टक्के व्याज देण्यास मंजुरी

•नमो महाराष्ट्र प्रतिनिधी




**उमरखेड :** उमरखेड पंचायत समिती प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेची ४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, २७ सप्टेंबर रोजी आर्य वैश्य भवन, उमरखेड येथे उत्साहपूर्ण व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. संस्थेच्या उपाध्यक्षा मिराताई हनुमंतराव कदम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेला संस्थेचे पदाधिकारी, संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी तसेच तालुक्यातील सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभेच्या प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर संस्थेच्या उपाध्यक्षा मिराताई कदम यांनी प्रास्ताविकातून पतसंस्थेच्या वर्षभरातील कामकाजाचा तसेच आर्थिक प्रगतीचा आढावा सभासदांसमोर मांडला. सभेचे संचालन संचालक पुष्पजित राणे यांनी केले, तर संस्थेचे सचिव अमरदीप दवणे यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या अहवालाचे वाचन केले. यावेळी आर्थिक वर्ष २०२५-२६ चा आर्थिक अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, अंदाजपत्रक तसेच संस्थेच्या विविध आर्थिक बाबी सभासदांसमोर सादर करण्यात आल्या. उमरखेड पंचायत समिती प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था सुरुवातीपासूनच नफ्यात कार्यरत असून संस्थेला सातत्याने 'अ' वर्ग प्राप्त होत असल्याचे सभेत सांगण्यात आले. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये संस्थेने तब्बल २ कोटी २० लाख रुपयांचा नफा मिळविला आहे. संस्थेच्या एकूण ५३७ सभासदांच्या सहकार्यामुळे तसेच ठेवीदार व कर्जदारांच्या विश्वासामुळे पतसंस्थेची आर्थिक वाटचाल भक्कम होत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. संस्थेचे कार्यक्षेत्र उमरखेड तालुका असून पुसद, महागाव, दिग्रस आणि यवतमाळ तालुक्यातील सभासदांचाही संस्थेशी संबंध आहे. सभेतील प्रमुख घोषणेकडे सभासदांचे लक्ष लागले होते. आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील नफ्यातून सभासदांना १४.५० टक्के लाभांश देण्याची घोषणा संस्थेचे सचिव अमरदीप दवणे यांनी केली. तसेच मासिक ठेवींवर १० टक्के व्याज देण्याचा निर्णयही सभेत मांडण्यात आला. दोन्ही निर्णयांना आमसभेने मंजुरी दिली. याशिवाय सन २०२५-२६ च्या नफ्यातून सभासदांना भेटवस्तू देण्याची घोषणाही करण्यात आली. या प्रस्तावालाही सभासदांनी मंजुरी दिली. सभेदरम्यान सभासदांनी संस्थेच्या आर्थिक व्यवहारांसह विविध विषयांवर लेखी प्रश्न व शंका उपस्थित केल्या. संस्थेचे सचिव अमरदीप दवणे यांनी सभासदांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देत त्यांच्या शंकांचे निरसन केले. त्यामुळे सभासदांनी समाधान व्यक्त केले. संस्थेच्या आर्थिक प्रगतीबद्दल सभासदांनी समाधान व्यक्त करत अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव आणि संचालक मंडळाचे अभिनंदन केले.

वार्षिक सभेच्या निमित्ताने संस्थेच्या सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा तसेच सेवानिवृत्त झालेल्या सभासदांचा विशेष सत्कार करण्यात आला. गुणवंत पाल्यांना प्रोत्साहन देण्यात आले, तर सेवानिवृत्त सभासदांचा शाल व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. सभेचा संपूर्ण कार्यक्रम शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शेवटी संस्थेच्या उपाध्यक्षा मिराताई कदम यांनी उपस्थित सर्व सभासदांचे आभार मानले. त्यानंतर स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

यावेळी संभाजी पुंडे, अरुण बुरकुले, विजय मुंगे, पुष्पजित राणे, संतोष खुपसे, आनंद कुंबरवार, विनय चव्हाण, अमोल पाईकराव, राजेश्वरी दराडे, रामदास केंद्रे, रमेश राठोड, व्यवस्थापक सुनील दगडफोडे, महेश भोकरे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, संचालक मंडळ, कर्मचारी व मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

